# ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १९/१२/२०१४

**मा. सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक २५ दिनांक १९/१२/२०१४**
**सभा सूचना क्रमांक ०८ दिनांक १०/१२/२०१४**
**सभा क्रमांक ०१ दिनांक १९/१२/२०१४**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १९/१२/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक ०८ दिनांक १०/१२/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. संजय भाऊराव मोरे हे उपस्थित होते.

**१) श्री. संजय भाऊराव मोरे - महापौर**
**२) श्री. राजेंद्र रमेश साप्ते - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नरेश रतन मणेरा | ४ | मढवी बिंदू महेंद्र |
| ५ | डुंबरे मनोहर जयसिंग | ६ | मुकेश मधुकर मोकाशी |
| ७ | उज्वला रामचंद्र फडतरे | ८ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे |
| ९ | पुर्णेकर जयनाथ यशवंत | १० | स्नेहा अंकुश पाटील |
| ११ | मधुकर रामचंद्र पावशे | १२ | उषा संजय भोईर |
| १३ | भोईर संजय देवराम | १४ | हरिश्चंद्र श्रीपत पाटील |
| १५ | चव्हाण तेजस्विनी किरण | १६ | चव्हाण सुधाकर वामन |
| १७ | इंदिसे रेखाबाई मिनानाथ | १८ | संभाजी धोंडिराम पंडीत |
| १९ | प्राजक्ता प्रदिप खाडे | २० | विलास चंदू कांबळे |
| २१ | सुशिला संकटाप्रसाद यादव | २२ | राजकुमार रामनयन यादव |
| २३ | सरैय्या अमित जयसिंग | २४ | जगदाळे हनुमंत ज्ञानु |
| २५ | पाटील वर्षा वसंत | २६ | पालांडे दशरथ बाबुराव |
| २७ | भोईर विमल अर्जून | २८ | चव्हाण विक्रांत भिमसेन |
| २९ | पाटील कल्पना हरिश्चंद्र | ३० | पांडे संजय श्रीनाथ |

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

३१ पाटील शारदा विजय
३२ लासे विजया मनोज
३३ गौरी अनिता सुनील
३४ पाटील उमेश काशिनाथ
३५ पाटील रत्नप्रभा लक्ष्मण
३६ देसाई सुहास सुर्यकांत
३७ महेश्वरी संजय तरे
३८ एगडे रामचंद्र हरी
३९ नंदा कृष्णा पाटील
४० नंदिनी राजन विचारे
४१ मंदार प्रमोद विचारे
४२ वडवले संतोष वसंत
४३ कणसे निर्मला शरद
४४ वैती अशोक बारकू
४५ तायडे रामभाऊ महादेव
४६ भोईर एकता एकनाथ
४७ आशा बाबासाहेब कांबळे
४८ जितेंद्र प्रभाकर वाघ
४९ शान मनप्रीतं गुरमकसिंग
५० शिंदे मनोज तुकाराम
५१ संगिता माणिक पाटील
५२ काशिराम गोविंद राऊत
५३ घाडीगांवकर संजय पांडुरंग
५४ मोरे संध्या सुनिल
५५ खताळ विशाखा मधुकर
५६ जानकर योगेश तातोबा
५७ जगताप अश्विनी अशोक
५८ भोसले नम्रता दिपक
५९ म्हस्के नरेश गणपत
६० हिराकांत बेंडू फर्डे
६१ पाटील सुजाता भास्कर
६२ मोरे रुचिता राजेश
६३ नारायण शंकर पवार
६४ सोनार सारिका संजय
६५ कोकाटे सुधीर विष्णु
६६ महेश सुरेश वाघ
६७ वाघ पुजा गणेश
६८ नजीब सुलेमान मुल्ला
६९ वहिदा मुस्तफा खान
७० साळवी अपर्णा मिलींद
७१ पाटील मनाली मिलींद
७२ पाटील मिलींद भारत
७३ केणी प्रमिला मुकूंद
७४ केणी मुकूंद बाळू
७५ महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट
७६ सामंत विलास शिवराम
७७ संजय संतू वांघुले
७८ पाटील मालती रमाकांत
७९ भरत अभिमन्यु चव्हाण
८० टिकमानी लक्ष्मण (लच्छू)
८१ नाईक राजश्री सुनिल
८२ राजे गिरीश अनंत
८३ राजेश भालचंद्र गवारी
८४ पाटील अवंतिका शशिकांत
८५ ठाकूर अक्षय अनंत
८६ यादव रिटा राजनाथ
८७ कळंबे मंगल चंद्रकांत
८८ काकडे बालाजी दगडू
८९ कुरेशी साजिया आई
९० कुरेशी यासीन अय्युब
९१ असिया यासिन कुरेशी
९२ विश्वनाथ भगत
९३ गोटे सिंधू कुंदन
९४ किणे राजन नारायण
९५ पाटील रेश्मा रमेश
९६ मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग
९७ पठाण अशरफ उस्तान
९८ हफिजा नसीरुद्दीन नाईक
९९ आशरीन इब्राहीम राऊत
१०० खान मिराज नईम
१०१ हिरा सिताराम पाटील
१०२ पाटील शैलेश मनोहर
१०३ मुंडे सुनिता गणेश

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

## रजा सदस्य :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उज्ज्वला रामचंद्र फडतरे | २ | जाधवर राधाबाई सुभाष |

## गैरहजर सदस्य :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरज प्रगती भारत | २ | आशादेवी शेरबहादूर सिंह |
| ३ | वाव्हळ सुभाष सिताराम | ४ | राधा फत्तेबहादूर सिंह |
| ५ | सरनाईक परिषा प्रताप | ६ | सरनाईक विहंग प्रताप |
| ७ | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर | ८ | मिलिंद माधव पाटणकर |
| ९ | बोरीटकर प्रभा अशोक | १० | वेतकर दिपक विजय |
| ११ | संखे मिनल मुकुंद | १२ | महेश जगन्नाथ साळवी |
| १३ | मनिषा महेश साळवी | १४ | हंडोरे मेघना सुनिल |
| १५ | लोखंडे सुहासिनी सुनिल | १६ | अनिता अरुण बिर्जे |
| १७ | रेखा भालचंद्र पाटील | १८ | भगत सुधीर रामचंद्र |
| १९ | डोंगरे सिराज महम्मद अली | २० | अन्सारी साजिया परवीन सरफराज |

**प्रश्न क्रमांक १ :-**

सन्मा.सदस्य श्री. संजय वाघुले यांनी दि. १३.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये मल:निसरण केंद्र क्र. २ ज्या जागेवर बांधले आहे. त्या जागेची मालकी कोणाच्या नावावर आहे. | ठाणे महानगरपालिकेच्या नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रामध्ये उदंचन केंद्र क्र. २ ज्या जागेवर बांधलेले आहे ती जागा महाराष्ट्र शासनाच्या MWSSB यांचेमार्फत राबविण्यात आलेल्या टप्पा क्र. १ व २ या योजनेअंतर्गत १९८५-८६ साली महापालिकेने हस्तांतरीत केल्याचे दिसून येते. तथापि कागदोपत्री मनपाच्या नावी झालेबाबतचे कागदपत्र सध्यस्थितीत दप्तरी दिसून येत नसल्याने त्याबाबत तलाठी कार्यालयाकडून माहिती घेऊन आपणास अलहिदा कळविण्यात येईल. |
| २ | सदर मलनि:सारण केंद्राच्या जमिनीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या एकूण किती इमारती अस्तित्वात आहेत. सदर इमारतीमध्ये जीवन प्राधिकरणाचे किती कर्मचारी राहत आहेत. त्यांची नांवे सादर करावीत. | |
| ३ | सदर जमिन ठा.म.पा. मालकीची असल्यास ७/१२ उता-यावर (प्रॉपर्टी कार्ड) ठा.म.पा. ची नोंद आहे का? याची माहीती देण्यात यावी. | क्र. १ नुसार कागदपत्र उपलब्ध करुन घेतल्यानंतर आपणास याबाबत माहीती देण्यात येईल. |
| ४ | ठामपाने रस्ता रुंदीकरणामध्ये सदर जागेत एकूण कितीजणांना विस्थापित करण्यात आले आहेत ? त्यांची नावे सांगणे. | |
| ५ | ठाणे महानगरपालिकेच्या जमिनीवर प्राधिकरणाच्या कर्मचा-यांकडून / इमारतीमध्ये राहत असलेल्या रहिवाशांकडून किती मालमत्ता कराची थकबाकी आहे ते कळविणे | ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या ठामपाच्या जमिनीवरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या इमारतीमध्ये राहत असलेल्या मालमत्ताधारकांची मालमत्ता कराची किती थकबाकी येणे आहे याबाबतची माहिती या विभागाकडिल परिपत्रक क्र. ठामपा/कनिवसं २८७ दि.१०/१२/२०१४ अन्वये मागविण्यांत येत आहे. माहिती प्राप्त होताच, अलाहिदा कळविण्यांत येईल. |

सही/-

उपनगरअभियंता, मलनिस्सारण विभाग,
कर निर्धारक व संकलक
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रश्न क्रमांक २ :-**

सन्मा.सदस्या श्रीमती मनप्रीत सिंग यांनी दि. २९.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>१.</td><td>श्रीनगर परिसरातील सेक्टर ३ सर्व्हे नंबर ४३२ पैकी हया जागेत बनवण्यात येणारे हँगीग गार्डनची जागा ही कोणाच्या मालकीची आहे</td><td rowspan="3">मौजे पांचपाखाडी , सर्व्हे नंबर ४२७ ते ४३५ व ४८५ या भूखंडावर मे. भवानी ब्रदर्स यांचे करिता मे. युनिट आर्सेन्स डेव्हलपर्स यांनी दाखल केलेल्या विकास प्रस्ताव क्र. ८७४ या प्रस्तावास दि.०१/०३/१९८८ रोजी मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर मंजूर अभिन्यासात उक्त मुद्यात नमूद जागा गार्डन करिता दर्शविलेले आहे.<br>मे. युनिट अर्सेन्स डेव्हलपर्स कंपनीचे भागिदार यांनी सदर गार्डनच्या जागेवर हँगीग गार्डन बनविण्यास तसेच सदरची जागा ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरण करणे बाबत हरकत नसल्याचे पत्रान्वये विनंती केलेली आहे.<br>तसेच सदर गार्डन लगत असलेल्या महावीर दर्शन को. ऑ. हौ. सोसायटी लि. यांनी सदर जागेवर वारंवार अतिक्रमणे होत असून, त्या ठिकाणी अनधिकृत झोपडया वाढत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातुन गार्डनचे काम होत आहे. सदरचे काम झाल्यावर त्याचा फायदा सर्वांना होणार आहे. तरी सदर जागेमध्ये काम करण्यास हरकत नसल्याबाबतचे कळविलेले आहे.<br>तसेच सदर मंजूर नकाशा अंतर्गत सदर जागेचे (गार्डन) च्या क्षेत्राचा टी.डी.आर.विकासकास दिल्याची नोंद नाही. तसेच मंजुर नकाशात सदर जागेचे क्षेत्रफळ नमूद नाही.</td></tr>
<tr><td>२.</td><td>ही जागा ज्यांच्या मालकीची आहे त्या जमिन मालकांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे का ?</td></tr>
<tr><td>३.</td><td>जमीन मालक धारकाने हयापुर्वी जागेचा टि. डी. आर. घेतलेला आहे का व हया जागेचे क्षेत्रफळ किती ?</td></tr>
<tr><td>४.</td><td>सहायक वन संरक्षक (प्रा.) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली यांचे पत्र जा. क्र. स. व. सं/जमिन/२०५ सन २०१०-११, बोरीवली दि. ०८/०३/२०११ सोबत प्राप्त झालेली यादी व नकाशामध्ये विषयांकित जमिनीचा समावेश केलेला आहे. तरी सबब उद्यान विभागाची परवानगी घेतलेली आहे का ?</td><td>सदर मुद्यांत नमुद पत्रासोबतच्या यादीत सदर भूखंडाचा समावेश आहे.<br>उद्यान विभागाच्या परवानगी बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत माहिती घेणे योग्य राहील.</td></tr>
<tr><td>५.</td><td>हँगीग गार्डनच्या मधोमध मंदिर बनवण्यात येत आहे. त्याची शासनाकडुन परवानगी घेण्यात आली आहे का ?</td><td>मंदिरा बाबत इकडील विभागामार्फत कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही.</td></tr>
</table>

सही/-
सहायक संचालक नगर रचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रश्न क्रमांक ४ :-**

सन्मा.सदस्य श्री. राजकुमार यादव यांनी दि. ३.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | शहर विकास विभागाच्या माध्यमातून नकाशे मंजूर करताना विकासकामे सादर केलेल्या प्रस्तावांतर्गत भूखंडांतून नाला जात असले तर त्या नाल्यांमध्ये समाविष्ट होणारे क्षेत्र निव्वळ क्षेत्रामधून विचारात घेण्यात येते किंवा कसे तसेच त्या नाल्याच्या क्षेत्रावर टिडीआर वापरण्यात येतो का किंवा कसे? | जागेवरील परिस्थिती, नगर भूमापन कार्यालयाकडील मोजणी नकाशात नाल्याखालील क्षेत्राची मालकी ई. तपासून सदरचे क्षेत्र अनुज्ञेय करणे व त्या क्षेत्रावर टिडीआर अनुज्ञेय करावा किंवा कसे याबाबत निर्णय होणे अपेक्षित आहे. |
| २. | मा. मुख्य अग्निशमन अधिकारी यांचा अंतिम ना हरकत दाखला न घेता इमारतीमध्ये राहण्यास लोकांना ताबा दिल्यास त्या विकासकावर कारवाई होऊ शकते का? कोणत्या स्वरुपाची? ती कारवाई करण्याची जबाबदारी कोणाची असते? | अग्निशमन विभागकडील ना हरकत दाखल्याची शर्त असल्यास व दाखला नसल्यास वापर परवाना देण्यात येत नाही. विना वापर परवाना इमारतीचा वापर सुरु असल्यास शहर विकास विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार कार्यवाही अपेक्षित आहे. |
| ३. | सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर INDP च्या माध्यमातून नाले बांधकामांच्या किती निविदा काढण्यांत आल्या आहेत. त्या सर्व निविदांच्या ठिकाणांची नांवे, त्या सर्व निविदेकरीता मंजूर केलेली रक्कम किती तसेच निविदेमध्ये दिलेल्या नकाशाप्रमाणे करणे किंवा वेळोवेळी कामांमध्ये झालेल्या बदलाप्रमाणे ठेकेदाराने काम करुन किंवा त्याप्रमाणे काम करुन घेणे बंधनकारक असवते का त्या बदलामुळे झालेल्या खर्चाची रक्कम देयकामधून कमी करण्यांत येते का ? अशी कामे कोणते ? | सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर INDP विभागाच्या माध्यमातून काढणेत आलेल्या निविदा कामाचा सविस्तर तपशिल सोबत जोडणेत आला आहे.<br>तसेच निविदेमध्ये दिलेल्या नकाशाप्रमाणे जागेवरील परिस्थितीनुसार आवश्यकतेप्रमाणे काम करुन घेण्यात येत असते व केलेल्या कामानुसारच देयक अदा करण्यात येते. |
| ४. | सन २०१३-१४ व १५ या आर्थिक वर्षामध्ये मा. खासदार, आमदार व सन्मा. नगरसेवक, ठामपा यांनी मागणी केलेली कामे वगळून सर्व बांधकाम विभागाच्या माध्यमातून मंजूर केलेल्या सर्व कामांची नावे त्या सर्व कामांकरीता खर्च झालेली रक्कम, ते सर्व कामे करणा-या संस्थांची / कंपनींची व जबाबदार अधिका-यांची नावे काय व हुद्द काय? | |
| ५. | मालमत्ता कराची व पाण्याची बीले छपाई करणे करीता खाजगी संस्थेला ठेका देण्यात आला आहे का? असल्यास त्या संस्थेचे नाव, त्या कामाकरीता मंजूर असलेली रक्कम किती? त्यापैकी अदा केलेली रक्कम किती? खाजगी संस्थेला देण्यात आलेल्या कामाचा खर्च व त्यापूर्वी ठामपाकडून छपाईकरीता येणारा खर्च हयामध्ये किती फरक आहे? त्यामुळे ठामपाचा अधिक फायदा किती झाला आहे ते काम करण्याचे कारण काय? | |

सही/-
सहायक संचालक नगर रचना
उपनगर अभियंता, आय.एन.डी.पी.
ठाणे महानगपालिका, ठाणे

ठाणे महानगरपालिका ठाणे

**प्रश्न क्रमांक ५ :-**

सन्मा.सदस्य श्री. उमेश पाटील यांनी दि. ३.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग-१, वर्ग-२, वर्ग-३ आणि वर्ग-४ अंतर्गत एकूण किती अधिकारी/कर्मचारी काम करीत आहेत ? | सोबत माहिती देण्यात येत आहे |
| २. | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एकूण मंजूर पदे किती ? त्यापैकी भरलेली आणि रिक्त पदे किती याची माहिती मिळावी | सोबत माहिती देण्यात येत आहे |
| ३. | रिक्त पदे भरणेबाबत ठाणे महानगरपालिका प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यांत आली याची माहिती मिळावी. | जाहिरातीद्वारे सरळसेवेने तसेच पदोन्नतीने व अनुकंपा/वारसा तत्वाने रिक्त पदे भरणेची कार्यवाही करण्यांत येते. सद्यस्थितीत त्यानुसार रिक्त पदे भरणेची कार्यवाही करण्यांत येत आहे. |
| ४. | पूर्वी १० लाख लोकसंख्या असलेल्या ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत असलेली २०-२५ लाख लोकसंख्या विचारात घेता किती अधिकारी/कर्मचारी यांची आवश्यकता आहे? | याबाबत कृती आराखडा तयार करण्याचे काम प्रस्तावित करुन ते शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. शासन मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यांत येईल. |
| ५. | त्यानुसार पदे मंजूर करुन घेऊन त्या पदावर अधिकारी/कर्मचारी नेमणूक करणेबाबत काय कार्यवाही करण्यांत आली याची माहिती मिळावी? | |

सही/-
उपआयुक्त (मुख्यालय),
ठाणे महानगरपालिका, ठाणे

-अधिकारी
ठाणे महानगरपालिका ठाणे

**प्रश्न क्रमांक ६ :-**

सन्मा.सदस्य श्री. राजन किणे यांनी दि. ८.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | विशेष नगर वसाहत विकास प्रस्ताव क्र.एस०६/ ००६३/१० अंतर्गत भूखंड मालकाचे नांव काय ? त्या भूखंडाच्या ७/१२ उता-यावर व फेरफार उता-यावर नोंदी असलेल्या सर्व व्यक्तींची नांवे काय ? सदरच्या भूखंडामध्ये शासनाच्या मालकीचे असलेले क्षेत्र किती ? त्याकरीता विकासकाने शासनास किती रक्कम अदा केली आहे, कोणत्या साली ? | |
| २) | सदर प्रस्तावांतर्गत भूखंडाच्या ७/१२ व फेरफार उता-यावर कुळ वहिवाटीची नोंद होती काय ? त्या व्यक्तींची नाव काय व ते क्षेत्र किती ? त्या कुळ वहिवाट व्यक्तीच्या खोटया स्वाक्ष-या करुन दस्तऐवज विकासकाने सादर केला आहे का ? | |
| ३) | सदर विकास प्रस्ताव अंतर्गत भूखंडामध्ये सी.आर. झेड. व ग्रीन झोनमध्ये असलेले क्षेत्र किती ? त्या क्षेत्रावर वापरण्यात आलेला भूनिर्देशांक किती ? त्या भूखंडावर असलेली आरक्षणे कोणती, तसेच आज पर्यंत सदर विकास प्रस्तावांतर्गत प्राप्त झालेल्या तक्रारदारांची नांवे व त्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईचे स्वरुप काय ? | |
| ४) | मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी २५ मीटर उंची पेक्षा जास्त असलेल्या इमारतीला सुरुवातीचा ना हरकत दाखला दिल्यानुसार शहर विकास विभागाने नकाशे मंजुर केले असतील व त्याप्रमाणे विकासकाने बांधकाम केले असेल तर असा इमारतीना वापर परवाना मिळणेकरिता वास्तुविशारद याने मुख्य अग्निशम अधिकारी यांचा अतिंम ना हरकत मिळणेकरिता शहर विकास विभागने मंजुर केलेला नकाशा सादर करणे बंधनकारक असते का ? जर वास्तुविशारद यांनी नकाशामध्ये फेरफार करुन नकाशा सादर केल्यास त्याच्यावर होणा-या कारवाईचे स्वरुप काय, ती कारवाई करणेची जबाबदारी कोणाची असते ? | |
| ५) | सी.एफ.ओ. हे भूखंडावरील विहिरीवर इमारतीचा नकाशा मंजुर करणेकरीता सुरुवातीचा ना हरकत दाखला देवू शकतात का, कोणत्या नियमाप्रमाने तसा दाखला आजपर्यंत सी. एफ.ओ. यांनी दिला आहे का ? तसेच विहिरीवर इमारतीचे नकाशे मंजूर करणे नियमानुसार योग्य आहे का ? | अग्निशमन विभागामार्फत देण्यात येणा-या सुवातीच्या ना हरकत दाखल्यामध्ये आगप्रतिबंधक उपाय योजना सुचवण्यात येत असून, इमारतीचे आराखडे मंजुर करणे अग्निशमन दलाच्या कार्यकक्षेत येत नाही .<br>प्रकरणी एखादया भुखंडावर विहीर अस्तित्वात असल्यास सदर भुखंडावरिल प्रस्ताव मंजुर करणे अथवा ना मंजुर करणे हे शहर विकास विभागाच्या आखत्यारीत येत असते.<br>अग्निशमन विभागाकडील उपलब्ध असलेल्या दफ्तरानुसार विकास प्रस्ताव क्रमांक २००७/३४ हया प्रस्तावातील इमारतीच्या बाहेरील मोकळया जागेत विहिर असून, सदर प्रस्तावास अग्निशमन विभागाकडील क्रमांक ठामपा/मु.अ.अ./मु-५०१ दिनांक २३/०१/२००८ अन्वये सुरवातीचा ना हरकत दाखला, क्रमांक ठामपा/मु.अ.अ./मु-१८८०/१८४ दिनांक १२/०३/२०१० अन्वये सुधारीत ना हरकत दाखला तर क्रमांक ठामपा/मु.अ.अ./मु-२९९६/१९६ दिनांक २२/०२/२०१३ अन्वये अंतिम नाहरकत दाखला देण्यांत आला आहे. |

सही/-

मुख्य अग्निशमन अधिकारी

**प्रश्न क्रमांक ७ :-**

सन्मा.सदस्य श्री. संजय घाडीगांवकर यांनी दि. ९.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | सन १९९७ ते डिसेंबर २०१४ पर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या सर्व विभागाच्या कामकाजामध्ये (शिक्षण मंडळ, परिवहन विभागासह अन्य सर्व विभागांबाबत) कोणकोणती अनियमितता/ भ्रष्टाचाराची प्रकरणे असल्याबाबत तक्रारी झाल्या आहेत ? त्या तक्रारीचे अनुषंगाने प्रशासनाने तयार केलेल्या चौकशी अहवालाची व कार्यवाहीची /कागदपत्रांसह माहिती द्यावी. | सदरची माहिती संकलित करण्याचे काम कार्मिक विभागाकडुन कार्यवाही सुरु असून, माहिती संकलित होताच देण्यात येईल असे सन्मा. नगरसेवक,श्री. संजय पांडुरंग घाडीगावकर, यांना दि.१८/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २ | सन १९९७ ते डिसेंबर २०१४ पर्यंत ठाणे महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा मंजुर कधी झाला? त्याची कोणकोणती अंमलबजावणी प्रशासनाने केलेली आहे? व कोणकोणती प्रलंबित आहे ? शहर विकास आराखडा अंमलबजावणी बाबत किती वर्षाची मुदत असते व विहीत मुदतीत शहर विकास आराखडा अंमलबजावणी न झाल्यामुळे ठाणे महानगरपालिकेचे कोणते नुकसान होऊ शकते ? शहर विकास आराखडा बनवितांना जे भूखंड विविध आरक्षणांनी आरक्षित केले गेले त्या भूखंडांचे त्यावेळेचे जमिनीचे मूल्य किती होते आणि आज किती आहे? | |
| ३ | मा.राज्य शासनाकडे महापालिकेच्या कामकाजाबाबत (शिक्षण मंडळ, परिवहन विभागासह अन्य सर्व विभागांबाबत ) तक्रारी दाखल झाल्यावर राज्यशासनाने सन १९९७ पासून डिसेंबर २०१४ पर्यंत कोणकोणत्या प्रकरणांबाबत /तक्रारींबाबत अहवाल मागविलेले होते? शासनास पाठविलेल्या अहवालांची कागदपत्रांसह माहिती द्यावी. | |
| ४ | सन १९८२-८३ पासून डिसेंबर २०१४ पर्यंत लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची पूर्तता /अनुपालन प्रशासनातील कोणकोणत्या विभागांनी केली आहे आणि उर्वरित किती रकमांचे आक्षेप अनुपालन सादर करण्याचे प्रलंबित आहे? याबाबत कामकाजातील त्रुटीमुळे किती कोटी रुपयांचे निव्वळ नुकसान झालेले आहे? | ठाणे महानगरपालिकेचे सन १९८२-८३ ते सन २०११-१२ पर्यंत लेखापरिक्षण अहवाल तयार केलेले असून ते मा.स्थायी समितीला वेळोवेळी सादर करण्यांत आलेले आहेत.<br>सन १९८२-८३ पासून डिसेंबर २०१४ पर्यंत लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची पूर्तता सर्व विभागांनी अत्यल्प प्रमाणात केलेली आहे. सन १९८२-८३ ते २०११-१२ पर्यंत एकूण प्रलंबित आक्षेपांची संख्या १४,५४७ इतकी आहे.<br>कामकाजातील त्रुटीमुळे सन २००७-०८ ते सन २०११-१२ पर्यंत संबंधित विभागाने लेखाआक्षेपांची पूर्तता/ अनुपालन सादर न केल्याने महापालिकेचे रक्कम रु. ६५,१२,८५,८७२/- चे निव्वळ आर्थिक नुकसान झाल्याचे लेखापरिक्षण अहवालानुसार दिसून येते. |

| | | |
|---|---|---|
| ५ | सन १९९७ ते डिसेंबर २०१४ पर्यंत प्रशासनातील कामकाजातील अनियमिततेबाबत मा.आयुक्तांनी मा. सर्वसाधारण सभेपुढे व मा. राज्य शासनाकडे अहवाल कधी ठेवलेला आहे ? त्या अहवालाची कागदपत्रांसह माहिती द्यावी. असा अहवाल न ठेवणेबाबत नियम कोणते आहेत? | मुद्दा क्र. १ प्रमाणे |

सही/-
कार्मिक अधिकारी
मुख्य लेखापरिक्षक
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रश्न क्रमांक ८ :-**

सन्मा.सदस्या सौ. रुचिता मोरे यांनी दिनांक १०/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | ठा.म.पा.घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे एकुण किती कंत्राटी कामगार काम करत आहेत. ते कोणत्या कोणत्या ठेकेदाराकडे काम करतात. त्यांची यादी दया. सगळया ठेकेदारांनी कंत्राटी कामगार अधिनियमामध्ये अनुज्ञप्ती घेतली आहे का? घेतल्यास त्याची छायांकित प्रत दया. | सार्वजनिक रस्ते साफसफाई व<br>सॅटीस प्रकल्प -१२०४<br>रिफ्युज कॉम्पॅक्टर - ८४<br>घंटागाडी -४५०<br>अनुज्ञाप्ती घेण्यात आलेली आहे. |
| २ | किमान वेतन अधिनियम, बोनस ॲक्ट सर्व कंत्राटी कामगारांना हे कायदे लागू होतात का ? या सर्व बाबी कंत्राटदार पाळतात का? या सर्व कंत्राटी कामगारांच्या संदर्भात महापालिकेने लक्ष ठेवण्यासाठी डिपार्टमेंटप्रमाणे अधिकाऱ्याची नेमणुक केली आहे का? असल्यास त्यांची नावे सांगा ? अशा अधिकाऱ्यांची नेमणुक केलेली नसल्यास का केली नाही ? | किमान वेतन अधिनियम बोनस, सर्व कंत्राटी कामगारांना लागू होतात या सर्व बाबी कंत्राटदार पाळतात.<br>सर्व कंत्राटी कामगारांच्या संदर्भात महापालिकेने नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभाग समिती निहाय रजिस्टर ठेवण्यात आले असून स्वच्छता निरिक्षक व उपमुख्य स्वच्छता निरिक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. |
| ३ | सर्व कंत्राटी कामगारा संदर्भात आपण रजिस्टर मेंटेन केलेले आहे का? कामगार उपआयुक्तांनी तपासणी केलेला रजिस्टर आपल्याकडे आहे का? | होय. |
| ४ | घंटागाडी वरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना पेमेंट कुठल्या अनुसूचीप्रमाणे मिळतो त्याची माहिती दया व आपल्याकडे किती घंटागाडया आहेत व कोणत्या कोणत्या प्रकारच्या घंटागाडया आहेत. कोणत्या कोणत्या ठेकेदारांना घंटागाडयांचे काम दिले आहेत त्यांची माहिती दया. | घंटागाडीवरील कामगारांना अनुसूची ४९ प्रमाणे वेतन अदा करतात. सहाचाकी, तीनचाकी व चारचाकी एकुण घंटागाडया १६६ आहेत. तीनचाकी, चारचाकी व सहाचाकी अशा तीन प्रकारच्या घंटागाडया आहेत.<br>१) मे.एम.कुमार ग्रुप<br>२) मे.अमृत एंटरप्रायझेस<br>३) मे.सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन |
| ५. | बांधकाम विभाग, शिक्षण विभाग, विद्युत विभाग या सर्व ठेकेदारांची आपल्याकडे नोंदणी आहे का? ते कामगार कायदा पाळतात का ? | ठाणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे ठेकेदारांची नोंदणी करण्यांत येत नाही. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील विद्युत विभागातील नोंदणीकृत ठेकेदारांना निविदे मार्फत कामाचे ठेके देण्यात येतात व त्यांच्यावर नियमानुसार लागू असलेले सर्व कामगार कायदे बंधनकारक असतात.<br>ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या शाळा इमारतींची साफसफाई करणेकरीता ज्या ठेकेदारास काम देण्यात आलेले आहे, तो ठेकेदार नोंदणीकृत आहे. सदरचा ठेकेदाराने शासन नियमानुसार नोंदणी केलेली असल्याने त्यांना शाळा साफसफाईचे काम देण्यात आले आहे. सदरहू ठेकेदार कामगार कायदा पाळतात. |

सही/-
उपआयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
उप नगर अभियंता (वि.)
ठाणे महानगरपालिका, ठाणे

नगरसचिव
ठाणे महानगरपालिका ठाणे

**प्रश्न क्रमांक ९ :-**

सन्मा.सदस्य श्री. संतोष वडवले यांनी दि. ५.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | ठामपा हद्दीमध्ये अस्तित्वातील मलवाहिन्यांचे चोकअप काढणे व देखभाल दुरुस्ती अशा कामाकरीता किती निविदा काढण्यात आल्या होत्या, त्याकामाचे कार्यादेश दिलेला व करारनामा केल्याचा दिनांक काय? त्या कामाअंतर्गत करण्यात आलेल्या ठिकाणांची नावे व कामाकरीता जबाबदार असलेल्या अधिका-यांची नांवे तसेच त्या कामापोटी आजपर्यंत अदा केलेली व बाकी राहिलेली देयकाची रक्कम किती? | ठामपा हद्दीमध्ये अस्तित्वातील मलवाहिन्यांचे चोकअप काढणे व देखभाल दुरुस्ती अशा कामाकरीता एकुण ४ निविदा काढण्यात आलेल्या आहे. सदर निविदांच्या कार्यादेशाचा दिनांक व करारनान्याचा दिनांक या बाबातचा तपशिल सोबत जोडण्यात येत आहे.<br>तसेच त्या कामाअंतर्गत करण्यात आलेल्या ठिकाणे हि एकूण ६ प्रभाग समिती क्षेत्रात येतात.(म्हणजेच नौपाडा, उथळसर, वागळे, रायलादेवी, वर्तकनगर, कोपरी) येथील अस्तित्वात असलेलल्या मलवाहिनी व्यवस्थेमध्ये विविध ठिकाणी प्राप्त तक्रारी नुसार दुरुस्तीची कामे करण्यात येत असतात. तसेच नविन नेमणुकीनुसार (दि.१८.११.२०१४ पासुन) सदर कामाकरीता सद्यस्थितीत जबाबदारी असलेल्या अधिका-यांची नावे खालील प्रमाणे आहेत.<br>१. श्री.कैलास मुंबईकर (उपनगर अभियंता, मलनिस्सारण विभाग)<br>२. श्री.रामकृष्ण कोल्हे (कार्यकारी अभियंता, मलनिस्सारण विभाग)<br>३. श्री.विवेक कारंडे (उप अभियंता, मलनिस्सारण विभाग)<br>४. श्री.सुनिल साजनानी (कनिष्ठ अभियंता, मलनिस्सारण विभाग)<br>सदर चोकअप काढणे व देखभाल दुरुस्ती या कामापोटी आजपर्यंत कोणतेही देयक अदा करणेत आलेले नाही. |
| २. | पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये ज्या नवीन गृहसंकुलांच्या अभिन्यासामध्ये मुख्य जलवाहिनी अंथरणे किंवा टाकण्यासाठी मंजूरी देण्यांत आली आहे, अशा सर्व गृहसंकुलांची नांवे व त्या प्रत्येक गृहसंकुलांकरीता मंजूर केलेल्या मुख्य जलवाहिनीचा व्यास किती ते मंजूर करण्याकरीता जबाबदार असलेल्या लायसन्स प्लंबर व अधिका-यांची नांवे काय ? | उपरोक्त प्रश्न क्र. २ व ३ मधील पाणी पुरवठा विभागाशी संबंधित असलेली माहिती मिळणेबाबत संबंधित कार्यकारी अभियंत्यांना पत्र देण्यांत आलेले असून, सदरची माहिती प्राप्त होण्यास कालावधी लागणार असल्याने सदरची माहिती पुढील महासभेत सादर करण्यांत येईल. |

नगरसचिव

| | | |
|---|---|---|
| ३ | ठामपा हद्दीमध्ये नवीन गृहसंकुलांना ओसी मिळणेकरीता पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागाची एन.ओ.सी. देणेकरीता जबाबदार असलेल्या अधिका-यांची नांवे व हुद्दे काय ? त्यांची सन २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये एन.ओ.सी. दिलेल्या गृहसंकुलांची नांवे अथवा व्ही.पी.नं. काय आहेत ? त्या सर्व एन.ओ.सी. नियमानुसार आहेत का ? | अ) ठामपा हद्दीमध्ये नवीन गृहसंकुलांना ओसी मिळणेकरीता मलनिःसारण विभागाची एन.ओ.सी. देण्याची कार्यवाही खालील अधिका-यांकडुन करण्यात येते.<br>नगर अभियंता :- श्री. के.डी. लाला<br>:- श्री. रतन अवसरमोल<br>उपनगर अभियंता :- श्री.कैलास मुंबईकर<br>(दि.१८.११.२०१४ पासुन)<br>कार्यकारी अभियंता:-<br>श्री. मंगेश गिते<br>श्री. भारत भिवापुरकर<br>श्री. रामकृष्ण कोल्हे<br>(दि.१८.११.२०१४ पासुन)<br>उप अभियंता:-<br>श्री. प्रविण सापळे<br>श्री. विवेक कारंडे<br>(दि.१८.११.२०१४ पासुन)<br>कनिष्ठ अभियंता:-<br>श्री. सुनिल सजनानी<br>श्री. अनंत बडे<br>श्री. वामन सखदेव<br>श्री. अतुल भोळे<br>ब) मलनिःसारण कामी सन २०१३-१४ व २०१४-१५ साली देण्यात आलेल्या एन.ओ.सी ची माहिती दर्शविणारी यादी सोबत जोडली आहे.<br>क) सर्व एन.ओ.सी. नियमानुसार देण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त प्रश्न क्र. २ व ३ मधील पाणी पुरवठा विभागाशी सबंधित असलेली माहिती मिळणेबाबत संबंधित कार्यकारी अभियंत्यांना पत्र देण्यांत आलेले असून, सदरची माहिती प्राप्त होण्यास कालावधी लागणार असल्याने सदरची माहिती पुढील महासभेत सादर करण्यांत येईल. |
| ४ | भुयारी गटार योजना टप्पा क्र. २ अंतर्गत पूर्ण झालेल्या व अपूर्ण असलेल्या पंपींग स्टेशनच्या ठिकाणांची नांवे काय ? त्या प्रत्येक स्टेशनच्या कामापोटी अदा केलेल्या व बाकी असलेल्या देयकांची रक्कम किती ? अपूर्ण असलेले पंपींग स्टेशनच्या कामाची सद्यःस्थिती कायआहे ? ते काम पूर्ण कधी होणार ? ते काम अपूर्ण राहण्याचे कारण काय ? ते काम अपूर्ण राहण्याकरीता जबाबदार कोण आहे? | अ) भुयारी गटार योजना टप्पा क्र. २ अंतर्गत ५ उदंचन केंद्रापैकी एकही उदंचन केंद्राचे काम १०० टक्के पुर्ण झालेले नसुन पाचही उदंचन केंद्राची कामे अपुर्ण अवस्थेत आहेत.<br>ब)उदंचन केंद्राकरीता अदा करण्यात आलेली व बाकी असलेल्या देयकाची माहिती सोबतच्या तक्त्यात देण्यात येत आहे.<br>क) अपुर्ण असलेल्या सर्व पाचही उदंचन केंद्राचे काम पुर्ण करण्यासाठी २ वेळा निविदा (३ वेळा निविदेस मुदतवाढ देवुन) मागविण्यात आल्या असुन योग्य प्रतिसाद न मिळाल्याने व अवाजवी दराच्या निविदा असल्याने आता तिस-यांदा निविदा काढण्याची कार्यवाही सुरू आहे.<br>ड) जुन्या निविदाकाराने काम अर्धवट सोडुन दिल्याने व प्रकरणी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने वरील पाचही उदंचन केंद्राचे काम अपुर्ण स्थितीत आहेत. आता हे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने विभागाकडुन निविदा काढण्याचे काम सुरू आहे. |

सही/-

उपनगरअभियंता, मलनिस्सारण विभाग,
उप नगर अभियंता, पाणी पुरवठा विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रश्न क्रमांक १० :-**

सन्मा.सदस्य श्री. रामभाऊ म. तायडे यांनी दि. २७.११.२०१३ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता मंगेश गिते हे ठामपाच्या सेवेत कोणत्या सालापासून रुजु झाले आहेत. तेव्हापासून त्यांनी कोणत्या पदावर कामे केली आहेत. त्यांनी आजपर्यंत त्यांच्या मालमत्ता विषयक विवरणपत्रे सादर केली आहेत का ? कोणत्या सालापर्यंत ? तसेच त्यांची आजपर्यंत ठामपा माध्यमातुन कर्तव्यात कसूर अथवा नियमबाह्य काम करणे, ठामपाचे आर्थिक नुकसान करणे तसेच काम न करता ठेकेदारास देयक अदा करणे याबाबत चौकशी सुरु आहे का ? सुरु असल्यास त्याची सद्यस्थिती काय आहे ? त्यांच्या सेवेचा कार्यकाल किती बाकी आहे ? सन २०१३-१४ व १५ मध्ये त्यांच्या स्वाक्षरीने मंजूर केलेली कामे कोणती ? | श्री.मंगेश गीते यांचे महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाकडून ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपअभियंता या पदावर सन २००० पासून समावेशन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत ते उपअभियंता पदावर कार्यरत असून त्यांचेकडे कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यांनी त्यांचे सन २००५ अखेर व सन २०१० अखेर पर्यंतचे मालमत्ता व दायित्व विवरणपत्र कार्यालयाकडे सादर केले आहे. तसेच टँकर पाणीपुरवठा प्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत श्री.मंगेश गीते यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे. ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील त्यांच्या सेवेचा ५ वर्षे ३ महिने इतका कार्यकाल शिल्लक आहे. सन २०१३-१४ मध्ये त्यांच्या स्वाक्षरीने मंजूर झालेल्या कामांबाबत या विभागाकडे माहिती उपलब्ध नाही. |
| २) | ठा.म.पा. च्या २१० MLD पाणी पुरवठा योजनेच्या २०५२ MM Rising Main व २०४४ MM Gravity Main शुध्द पाण्याच्या जलवाहिनीला पेंटींग करणेकरीता निविदा काढण्यात आल्या होत्या का ? कोणत्या साली त्या प्रत्येक साली मंजूर असलेली खर्चाची रक्कम किती ? त्या कामाच्या निविदांमध्ये असलेले कामाचे अंतर व पेटींगच्या कामामध्ये वापरण्यांत येणारे कलरचा प्रकार व इतर कामाचे स्वरुप काय ते काम करुन घेण्याची जबाबदारी कोणाची होती. त्यांनी निविदेप्रमाणे कामाची खात्री करुन निविदाकारास देयक अदा केले आहे का ? | सन २०११ साली ठा.म.पा. च्या २१० MLD पाणी पुरवठा योजनेच्या २०५२ MM Rising Main व २०४४ MM Gravity Main शुध्द पाण्याच्या जलवाहिनीला पेंटींग करणेकरीता रु. १,२५,८४,९००/- अंदाजखर्चाची निविदा काढण्यात आली होती. सदर कामाकरीता अंदाजखर्चापेक्षा २३.५% ने कमी निविदेस मा. महासभेने ठराव क्र. १५३ दि. ५/१०/२०१२ नुसार मंजूरी दिलेली असून, त्यानुसार येणा-या खर्च रु. ९६,२७,४४८/- ला मंजूरी दिलेली आहे. सदर निविदेत जलवाहिनीवरील पृष्ठभाग साफ करणे व त्यावर ईपॉक्सी कलर मारणे इ. कामाचा अंतर्भाव करण्यांत आला होता. सदर काम करुन घेण्याची जबाबदारी श्री. मंगेश गीते (कार्यकारी अभियंता), श्री. कैलास पाटील (उप अभियंता), श्री. सुरेश वाघेरे (कनिष्ठ अभियंता ) यांचे देखरेखीखाली करण्यांत आले असून, सदर कामाचे तयस्थ तांत्रिक लेखा परीक्षणामार्फत खात्री करुन देयक अदा करण्यांत आलेले आहे. |
| ३ | ठामपा हद्दीतील सेक्टर ४ मध्ये विकास प्रस्ताव क्र. २००२/७१ च्या भूखंडावर MRTP Act १९६६ चे कलम ४७ अन्वये NDZ (व्दितीय पट्टा) मध्ये बाधित झालेले क्षेत्र किती होते ? ते क्षेत्र प्रत्यक्ष जागेवर पाहणी व मोजमाप करुन NDZ मध्ये बाधित होत असल्यास अहवाल देणा-या भूमापकाचे नांव काय ? | MRTP १९६६ चे कलम ४७ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे विकास प्रस्ताव क्र. २००२/७१ अंतर्गतच्या अपीलावर झालेल्या सुनावणीचे अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये प्रस्तावाधिन भूखंड रासायनिक साठयापासुन २५० मी. अंतराच्या बाहेर येत असल्याचा अहवाल आरेखक श्री.काटे यांनी दिला आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | सदर प्रस्ताव अंतर्गत MRTP Act १९६६ चे कलम ४७ अन्वये NDZ मध्ये बाधीत झालेल्या भूखंडावर नकाशे मंजूर करताना तो NDZ भूखंड रासायनिक क्षेत्रा पासुन बाधीत होत असल्याचा अहवाल देणा-या भूमापकाने व ते नकाशे मंजूर करणा-या उप अभियंत्याचे नांव काय ? तसेच विकासकाचे व MRTP Act १९६६ चे कलम ४७ अन्वये शासनाकडे केलेल्या अपीलकर्त्याचे नांव काय ? TDR वापरलेल्या करारनाम्यातील व्यक्तीचे नांव व OC वर असलेल्या विकासकाचे नांवे काय ? | MRTP १९६६ चे कलम ४७ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांचेकडे विकास प्रस्ताव क्र. २००२/७१ अंतर्गतच्या अपीलावर झालेल्या सुनावणीचे अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये प्रस्तावाधिन भूखंड NDZ मध्ये बाधीत होत नसल्याचा अहवाल आरेखक श्री. काटे यांनी दिला.<br>विकास प्रस्ताव क्र. २००२/७१ अंतर्गत असलेल्या<br><br>भूखंडाची विभागणी होऊन उर्वरित भूखंडावर विकास प्रस्ताव क्र. २००५/१२८ अंतर्गत मंजुर झालेल्या नकाशावर उप अभियंता श्री. वाळूंज यांची स्वाक्षरी आहे.<br>विकास प्रस्ताव क्र. २००५/१२८ चे विकासक श्री.निखील सालीया व कोमल सालीया (मालक) निखील डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. अजय आशर हे असुन MRTP Act १९६६ चे कलम ४७ अन्वये शासनाकडे श्री, अजय आशर तर्फे भागीदार आशर रिलेटर्स यांनी अपील केले होते.<br>या विकास प्रस्तावांतर्गत टि.डी.आर. चा वापर श्री. निखील सालीया , निखील डेव्हलपर्स यांनी केला असुन वापर परवान्यावर श्री.निखील सालीया व कोमल सालीया (मालक) श्री. अजय आशर (पार्टनर) हे नाव नमुद आहे. |
| ५ | ठामपा हद्दीतील सेक्टर ४ मधील विकास प्रस्ताव २००३/१८१ च्या एकूण क्षेत्रातुन आरक्षण, सुविधा भूखंड व DP रस्त्यात बाधित होणारे क्षेत्र वजा करण्यात आले का ? DR रस्त्याचे क्षेत्र किती ज्या निव्वळ क्षेत्रावर ८० % TDR वापरण्यात आला आहे ते निव्वळ क्षेत्र किती आहे ? तसेच सदरचा भूखंड दुर्बल घटकांच्या घर बांधणीकरिता होता हे खरे आहे का ? त्याबाबत शासनाने कोणते निर्देश दिले आहेत. त्या भूखंडातून जात असलेल्यास नाल्याचे क्षेत्र किती ? ते क्षेत्र वगळण्यात आले आहे का ? किंवा त्या नाल्याचे क्षेत्र वापरुन त्या क्षेत्रावर देखील TDR वापरण्यात आला आहे का ? | विकास प्रस्ताव २००३/१८१ अंतर्भुत असणा-या प्लॉट अे व प्लॉट बी च्या क्षेत्रामधून आरक्षणे व सुविधा भूखंडाचे क्षेत्र वजा करण्यात आलेले आहे. मंजुर नकाशाच्या प्रती सोबत देण्यात येत आहे. प्रस्तावाधिन भूखंड मंजुर विकास योजने नुसार दूर्बल घटकांच्या घर बांधणीच्या आरक्षणाने बाधीत होत नाही. तसेच शासनाचे निर्देश प्राप्त नाहीत. भूनिर्देशांकाच्या आकडेमोडीचा तपशिल सोबत देण्यात येणा-या मंजुर नकाशाच्या प्रती मध्ये नमुद आहे. कृपया अवलोकन होणेस विनंती आहे. |

सही/-
आस्थापना अधीक्षक
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग,
सहायक संचालक नगर रचना,
ठाणे महानगपालिका, ठाणे

**प्रश्न क्रमांक ११ :-**

सन्मा.सदस्य श्री. अशोक वैती यांनी दि. ०३.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | ठाणे महानगरपालिका विविध सेवा संस्थांना विविध वाहिन्या टाकण्यासाठी उदा. महानगर टेलिफोन निगम, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पाणीपुरवठा, मलनि:स्सारण विभाग, महानगर गॅस व अन्य केबल संस्थांना कोणकोणत्या पध्दतीने रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यांत येते , तसेच ज्या ज्या पध्दतीने रस्ता खोदण्यासाठी परवानगी देत असते त्या त्या पध्दतीने संबंधित संस्थेकडून महापालिका किती चार्जेस आकारणी करते? तपशील देण्यांत यावा. | ठाणे महानगरपालिका विविध सेवा संस्थांना विविध वाहिन्या टाकण्यासाठी उदा. महानगर टेलिफोन निगम, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पाणीपुरवठा, मलनि:स्सारण विभाग, महानगर गॅस व अन्य केबल संस्थांना एच.डी.डी. , एम.टी, ओपन ट्रेन्चेस इ. पध्दतीने रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यांत येते. मा. महासभा ठराव क्र. ३०४, दि. २०.०२.२०१३ अन्वये मंजूर दराप्रमाणे रस्ता खोदकाम परवानगीसाठी आकारणी करण्यात येते. ठरावाची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे. |
| २. | ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत रिलायन्स कंपनीला सेवावाहिन्या टाकण्यासाठी एच.डी.डी. , एम.टी, ओपन ट्रेन्चेस व चेंबर कव्हर्स यासाठी प्रभाग समितीनिहाय परवानगी दिलेली आहे कां ? परवानगी देण्यांत आली असल्यास प्रत्येक प्रभाग समितीनिहाय किती कि.मी. रस्ता खोदण्यासाठी परवानगी दिली आहे ? यासाठी कोणकोणत्या पध्दतीने रस्ता खोदण्याकरीता रस्ते निहाय (रस्त्याचे नांव व विभागाचे नाव देण्यांत यावे )परवानगी देण्यांत आलेली आह? त्यासाठी रस्ता फोड फी म्हणून संबंधित कंपनीला किती रकमेचा भरणा करण्यासाठी कळविले असून त्यांचेकडून किती रक्कम महापालिकेमध्ये भरणा केलेली आहे? लोकेशननुसार त्यांचे स्वरुप कांय ? त्याची सविस्तर माहिती देण्यांत यावी. | ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत रिलायन्स कंपनीला सेवावाहिन्या टाकण्यासाठी एच.डी.डी. , एम.टी, ओपन ट्रेन्चेस व चेंबर कव्हर्स यासाठी प्रभाग समितीनिहाय परवानगी दिलेली आहे. त्याचा तपशील सोबत जोडण्यांत आला आहे. याबाबत एच.डी.डी. माईक्रोटन्लींग द्वारे परवानगी देण्यांत आलेली आहे. तसेच ओपन कट बाबत नौपाडा व उथळसर प्रभाग समितीसाठी परवानगी देण्यांत आलेली आहे. इतर प्रभाग समितीमधील ओपन कटबाबतची परवानगी दण्याची कार्यवाही सरु आहे. याबबत रस्ते निहाय व विभागनिहाय रस्त्यांची यादी सोबत जोडण्यांत येत आहे. एच.डी.डी. , एम.टी. साठी सर्व प्रभाग समितीकरीता रु. १५.५२ कोटी इतकी रक्कम भरणा करणेस मे. रिलायन्स या कंपनीला कळविले होते. त्यानुसार त्यांनी रु.१५.५२ कोटी इतकी रक्कम महापालिकेमध्ये भरणा केलेली आहे. तसेच नौपाडा व उथळसर प्रभाग समितीमध्ये ओपन ट्रेन्चकरीता अनुक्रमे रु. ३.२८ कोटी व रु. ५.३६ कोटी असे एकूण रु. ८.६४ कोटी रकमचा भरणा करणेस कळविण्यांत आले होते. त्याप्रमाणे त्यांनी अनुक्रमे रु. ३,२७,४८,०४२/- व रु. ५,३५,९३,२११/- असे एकूण रु. ८,६३,४१,२५३/- इतकी रक्कम महपालिकेकडे भरणा केलेली आहे. व लोकेशननुसार रस्ता खोदाईबाबत तक्ता सोबत जोडण्यांत आलेला आहे. |

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

१८.. ..
२.. ..

| | | |
|---|---|---|
| ३) | ठा.म.पा. हद्दीत उद्यान विभागामार्फत डिव्हायडर व फुटपाथलगत ग्रीनरीचे काम कोणत्या ठेकेदाराकडून करण्यात येते. तसेच ह्या कामांसंदर्भात बिल अदा करण्यांच्या अटी, शर्ती व निकष काय आहेत? काम न करता उद्यान विभागाचे संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमताने बिले काढली जातात अशा प्रकारची वस्तुस्थिती दिसून येते अशी परिस्थिती असेल तर याची जबाबदारी कोणावर निश्चित केली जाईल? | ठा.म.पा. हद्दीत उद्यान विभागामार्फत डिव्हायडर व फुटपाथलगत ग्रीनरीचे काम करण्यासाठी मा.ठाणे महानगरपालिका ठराव क्र.२४८ दि.२४/११/२०१० रोजीच्या मान्यतेने व मा.स्थायी समिती ठराव क्र.११२४ दि.२९/०४/२०११ अन्वये ५ वर्षांसाठी मे.कल्पतरुज हॉस्पीटॅलिट ॲण्ड फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., अंधेरी, मुंबई या एजन्सीची नियुक्ती झालेली आहे. या अनुषंगाने ठामपा/उवि/उपआ-४ दि.२४/०५/२०११ रोजी नमुद एजन्सीला मुळ कार्यादेश देण्यात आला असून त्या अंतर्गत जे डिव्हायडर व फुटपाथलगतचे हरित जनपथ बांधकाम विभागाकडून पुर्ण झालेले असतील तसेच तेथील सुशोभिकरणांची आवश्यता व त्यावेळी आर्थिक तरतुदीची उपलब्धता पाहून त्याबाबतचा सविस्तर अंदाजखर्चाचा प्रस्ताव सादर करुन नमुद एजन्सीकडून काम करुन घेण्यात येते. सदर एजन्सीला दिलेल्या सुशोभिकरणांचे कामांची बिले त्यांना दिलेल्या मुदतीत प्रत्यक्ष कामाच्या मोजमापानुसार रनिंग अथवा अंतिम देयकाने एजन्सी सोबत केलेल्या करारनाम्यानुसार अदा करण्यात येतात. सदर बाबतचा मा.ठाणे महानगरपालिका ठराव, मा.स्थायी समिती ठराव, करारनाम्याची प्रत व मुळ कार्यादेशाची प्रत सोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. काम न करता ठेकेदाराची बिले काढली जात नाहीत. मात्र तशी परिस्थिती असेल तर संबंधितांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. |

सही/-
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग
प्र. वरिष्ठ उदयान अधिक्षक,
ठाणे महानगपालिका, ठाणे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**मा.महापौर सो. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात.**
**तद्नंतर राष्ट्रगीत होऊन सभा दुपारी ठिक ०२.१५ वाजता सुरु झाली.**
**मा.महापालिका सचिव सभेचे परिपत्रक वाचून दाखवितात.**

**मा. महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, आजच्या सभेसमोर दोन सन्मा. सदस्यांचे रजेचे अर्ज प्राप्त झाले आहेत. सौ. राधाबाई सुभाष जाधवर आणि सौ. उज्ज्वला रामचंद्र फडतरे

मा.महापौर महोदय, आजच्या सभेसमोर ११ प्रश्न आहेत. आता आपण प्रश्नोत्तरांचा तास सुरु करतोय.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, सभा तहकूबीचे काय झाले?

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, तहकूबी, लक्षवेधी आधी घ्यायची की, प्रश्नोत्तरे आधी घ्यायचे? नियम काय आहे ते सांगा. तुम्ही मनासारखे काय करता?

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आता प्रश्नोत्तरं चालू करणार आहात की लक्षवेधी ?

**मा.महापालिका सचिव :-**

आता आपण प्रश्नोत्तरं घेतोय?

**श्री. संजय भोईर :-**

मा.महापौर महोदय, याच्या आधीची आणि आतापर्यंतची आपली प्रथा काय आहे? याच्या आधी आपण तहकूबी घेतल्या आहेत की, प्रश्नात्तर? सचिव, तुम्ही परिस्थिती बघून करता का?

**श्री. मनोज शिंदे :-**

सचिव, तुम्ही जे काही बोलता ते जबाबदारीने बोला. मागचे मिनिटस् काढून बघा आणि नंतर आम्हाला सांगा.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

मा.महापौर महोदय, मला मागच्या मी विचारले होते की, सभा तहकूबी प्रश्नोत्तराच्या आधी आपण घेऊ शकतो का? त्यावेळी मला घेऊ शकत नाही असे सांगितलेले होते आणि प्रश्नोत्तरे सुरु झाल्यानंतर सभा तहकूबी मा.महापौरांनी मागच्याच्या मागच्या वेळी केलेली होती. त्यावेळेस मी प्रत्रव्यवहार केला, शासनाकडे सुध्दा पत्र व्यवहार केला आहे. आणि मा. आयुक्तांकडे केला आहे की, नेमके काय उचित आहे हे मला कळवावे. त्यांनी मला सांगितले की, पिठासीन अधिकारी जो काही निर्णय घेतील त्याप्रमाणे आहे. त्यामुळे माझा इथे असा प्रश्न आहे की असे नियमाला धरुन आहे का? की, पिठासीन अधिकारी, मा.महापौर साहेब, सभा तहकूबी आधी घेऊ शकतात आणि प्रश्नोत्तरनंतर घेऊ शकतात असे नियमांत असेल तर ते दाखवावे आणि तसं असेल तर मग आता सभा तहकूबी आधी का घेऊ शकत नाही.? आणि मग आता प्रश्नोत्तर आधी कशाला? मा.महापौर महोदय, सभा तहकूबीसाठी एवढा मोठा विषय आहे. हे माझे म्हणणे आहे. सचिव साहेब, या विषयी मला माहिती दया.

महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, सभेच्या कामकाज नियमावलीमध्ये कामकाज बाबींचा क्रम ठरविलेला आहे. त्याप्रमाणे आपण आधी प्रश्नोत्तरं घेतो.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

पिठासीन अधिकारी मग मला असं उत्तर का दिले? मा.महापौर महोदय, मला सचिव विभागाकडून असे उत्तर दिले आहे की, पिठासीन अधिका-यांनी घेतलेला निर्णय योग्य असतो. पिठासीन अधिकारी म्हणून त्यांनी त्यांचा तो निर्णय घेतला. म्हणजे आधी सभा तहकूब झाली तर त्या सभेचे पुढचे सर्व कामकाज रद्द आहे.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, कामकाज नियमावलीमध्ये अशी तरतूद आहे की, कोणत्याही कामकाजाच्या बाबींची प्राधान्य सभागृह आणि पिठसीन अधिकारी हे मिळून ठरवू शकतात.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

मा.महापौर महोदय, एकमत झाले तर, एकमत झाले नव्हते. एकमत नसेल तर कायदा काय म्हणतो, कायदयातील तरतुदी काय म्हणतात?

**मा. सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, असे कुठे लिहीले आहे आणि आज आपण सर्व वर्तमानपत्रात बातम्या वाचतो की, सभा तहकूबीमध्ये वेळ जातोय त्यामध्ये महापालिकेचे नुकसान होते. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, आता आपण सभा सुरु करु या.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

म्हस्के साहेब, याबाबत मला निवेदन करायचे आहे की, महापालिका बीपीएमसीच्या तरतूदीप्रमाणे चालते आणि या ठिकाणी बीपीएमसीच्या तदतूदीनुसार सभागृहामध्ये लक्षवेधी मांडणे, सभा तहकूबी घेणे हा संविधानिक अधिकार आहे. एखादया विषयावर जर लक्षवेधी मांडली असेल तर त्या लक्षवेधीवर सभागृहात चर्चा ही झालीच पाहिजे. पत्रकार काय म्हणतात आणि आणखिन कोण काय म्हणतात याच्याशी आमचे काही देणे-घेणे नाही. आम्हाला लोकांनी या ठिकाणी चर्चा करायला आणि त्यांची मते मांडायला पाठविलेले आहे. अधिकार आहे की, नाही आणि चर्चा करण्याचा अधिकार आह की नाही आणि त्या अनुषंगाने मत मांडण्याचा अधिकार आहे की नाही .. .. ..

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी प्रश्नोत्तरं आधी घेण्यात यावीत हे उत्तर दिलेले आहे.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

वेळ जर वाया घालवायचा असेल तर निर्णय वेळेवर होत नाही त्याच्यावर झालं पाहिजे ना? मग लक्षेवधी घ्यायची वेळ येणार नाही. जर जनतेच्या प्रश्नांवर किंवा लक्षवेधीवर व्यवस्थीत निर्णय झाले तर लक्षवेधी घ्यायची वेळ येणार नाही. मा.महापौर महोदय, मी तुम्हाला विचारत नाही. मी सचिवांना विचारतोय कारण त्यांनी मला परवाच उत्तर दिले आहे. त्यामुळे नेमके काय आहे ते त्यांनीच मला उत्तर दयावे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, मला वाटते आपण कधी-कधी सभागृहात विषयाचं गांभिर्य लक्षात घेतो. सभा तहकूबीचा विषय गंभीर आहे. आपण प्रश्नोत्तर चालू करुन नंतर सभा तहकूब करतो हे बरे दिसणार नाही.

मा.महापौर महोदय, हा निश्चित सभागृह आणि आपला अधिकार आहे. आपण एकत्रितपणे ठरवायला पाहिजे. मला वाटते विषयाचे गांर्भिय लक्षात घेऊन ती सभा तहकूबी वाचावी. नियमावर जाण्यापेक्षा विषयाचे गांर्भिय लक्षात ठेवा की, ती सभा तहकूबी कोणत्या विषयावर आहे.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

मा.महापौर महोदय, अशाप्रकारची तक्रार मी वैद्यकिय अधिका-यांच्या बाबतीत ऑनलाईन न मागविता ऑफ लाईन मागविल्या म्हणून शासनाकडे तक्रार केली आहे. शासनाचे पत्र प्राप्त झाले आहे की, ऑफ लाईन्स घेतलेल्या मुलाखती रद्द करा. मा.महापौर महोदय, आजच पत्र प्राप्त झाले आहे त्याची प्रत मला आली आहे. त्यामुळे मला उगिचच शासनाकडे जायला लावू नका तुम्हीच योग्य ती उत्तरं दया.

**मा. महापालिका सचिव :-**

मा.पिठासीन अधिकारी यांच्या आदेशानुसार आता आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करतोय. सर्वप्रथम सन्मा.सदस्य श्री. संजय वाघुले यांचा प्रश्न आहे.

**श्री. संजय वाघुले :-**

मा. महापौर महोदय, मला उत्तर कोण देणार आहे?

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, तुम्ही प्रश्नोत्तर चालू केली आहे का? प्रश्नोत्तर चालू केली आहेत का? जर चालू केली असतील तर मला बोलायचे आहे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, अतिशय संवेदनशील विषय आहे. संपूर्ण जगाने त्या घटनेचा खेद नोंदवला आहे. अशा विषयाच्या चर्चेला तुम्ही वेळ घेताय?

**मा.महापालिका सचिव :-**

मा.पिठासीन अधिकारी यांच्या आदेशानुसार प्रश्नोत्तराचा तास आपण सुरु करतोय. अर्धातास आपण प्रश्नोत्तरांसाठी देतोय त्यानंतर सभा तहकूबी घेण्यात येईल.

**मा. विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, तहकूबीचा जो विषय आहे तो आपल्याला गंभीर विषय वाटत नाही. याचा अर्थ असा होईल ही या तहकूबीच्या विषयाला आपल्याकडे तेवढे गंभीर स्वरुप नाही. असं आहे का? मा. महापौर महोदय, तिथे विद्यार्थी गेलेत. आणि भारतातील संसंदेनी नव्हेतर जगाने त्याबाबत खेद व्यक्त केला आहे. एवढी मोठी घटना आहे आणि त्यामध्ये निष्पाप विदयार्थी गेलेले आहेत आणि त्यांच्यासाठी आपण अशाप्रकारे करतोय.

**मा.महापौर सो.**

मा.विरोधी पक्षनेते, ती घटना घडल्यानंतर लगेच दुस-या दिवशी आपली महासभा होती. त्यावेळी आपण कोणीही मुद्दा उपस्थित केला नाही. आणि सभाशास्त्राचा जो मुद्दा उपस्थित करताय तर तुम्ही सांगाताय की सगळया गोष्टी करा. गांर्भिय लक्षात घेऊन करा परंतू हे गांर्भिय मागच्या मिटींगला व्हायला पाहिजे हाते.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**श्री. मनोज शिंदे :-**

मागची जी सभा होती त्या सभेमध्ये सभा तहकूबी आपण घेऊ शकत नाही. म्हणून आजच्या सभेमध्ये आपण सभा तहकूबी घेतलेली आहे. मागच्या वेळी घेतली नाही म्हणून आता घेणार नाही अशाप्रकारचे वक्तव्य तुम्ही महापौर म्हणून करणं चुकीचे आहे.

**मा.महापौर सो. :-**

विषयाचे गांभिय जसे तुम्हाला आहे तसे आम्हालाही आहे.

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, संपूर्ण जगामध्ये विदयार्थी कँडल घेऊन निघाले आहेत. तुम्ही जनाची नाहीतर मनाची तरी ठेवायला पाहिजे.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)

**मा.महापौर सो. :-**

अर्धातासाच्या प्रश्नोत्तरानंतर तहकूबी घेण्यात येईल.

**श्री. रामभाऊ तायडे :-**

सचिव, जनाची नाहीतर मनाची .. .. .. जे काही आहे ते तुम्ही क्लीअर करा.

**श्री. मनोज शिंदे :-**

मी क्लीअर करु का? जनाची नाहीतर मनाची तरी लाज बाळगा.

(सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते.)

**श्री. बालाजी काकडे :-**

मा. महापौर महोदय, त्यांना शब्द मागे घ्यायला सांगा.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

मा.महापौर महोदय, हा विषय समाजा विरोधक म्हणून आम्हाला नाही कळला पण मग सत्ताधारी म्हणून किंवा तुम्ही प्रथम नागरिक होतात तुम्ही तरी हा विषय काढला का? तुम्ही विषय काढला पाहिजे होता. नसला तरी सत्ताधारी म्हणून तुम्ही तरी काढला का?

**श्रीम. मिनाक्षी शिंदे :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी जी सभा तहकूबी मांडली आहे. खरंतर जगभरात सगळीकडूनच त्याचा निषेध व्यक्त होतोय. त्याच्यासाठी सभा तहकूब करण्याची गरज नाही. दोन मिनिटं उभे राहून मनापासून जरी श्रध्दांजली दिलीतर ती त्यांच्यापर्यंत पोहचेल. २६/११ ला जो आपल्याकडे प्रकार झाला त्यावेळी त्यांनी तिथे किती सभा तहकूबी मांडल्या किंवा किती निषध व्यक्त केला. आपण प्रत्येक गोष्टीसाठी सभा तहकूब करतो. आपल्या देशाच्या भावना त्यांनी तेंव्हा जाणून घेतल्या का? आपण त्यांच्यासाठी दोन मिनिटं का होईना श्रध्दांजली देतोय. यासाठी लोकसभा किंवा विधानसभेमध्ये सुध्दा सभा तहकूबी मांडली नाही. शाळांमध्ये सुध्दा दोन मिनिटं मौन बाळगले. पण आपल्याला पूर्ण वेळ सभा तहमूब करुन काय मिळणार आहे ते कळलं नाही.

**श्री. मनोज शिंदे :-**

२६/११ ला त्यांनी काय केले त्याप्रमाणे आपण काय करायचे .. .. ..

**श्री. हिराकांत फर्डे :-**

मा. महापौर महोदय, सभाशास्त्रात जी क्रमवारी दिली आहे त्या क्रमवारीप्रमाणे सभा चालवावी.

**श्रीम. उषा भोईर :-**

मा. महापौर महोदय, हया घटनेमध्ये निष्पाप मुलांचा जीव गेलेला आहे. एक-दोन मुलांचा जीव गेलेला नाही. १३२ निष्पाप मुलांचा जीव गेलेला आहे. आई नऊ महिने आपले बाळ तीच्या उदरात वाढवते आणि ते वाढवत असताना अनेक स्वप्न बघितलेली असतात. आपलं शाळेत जाणार, असं होणार, तसं होणार. पण अशा घटनामुळे जर काळीमा फासला जाणार असेल आणि आपण हया गोष्टीमध्ये रस घेणार नसाल तर, मा.महापौर महोदय, आपण हिंदुस्थानात आहोत. आपण हिंदुसारखे वागायचे आहे. त्या लोकांसारखे वागायचे नाही. आपल्याला त्या लोकांसारखे वागायचे नाही. ते पाकिस्थानात आहेत त पाकिस्थानासारखे वागतील. आम्ही हिंदू आहोत आम्हाला हिंदू असल्याचा गर्व आहे. म्हणून आम्ही या ठिकाणी सभा तहकूबी मांडलेली आहे.

**मा.महापौर सो. :-**

हा विषय असा आहे की, विषयाचे गांर्भिय तुम्हाला-आम्हाला सर्वांना आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, प्रश्नोत्तरानंतर घ्यावी की, आधी घ्यावी हा विषय महत्वाचा नाही. त्या विषयाचे गांर्भिय लक्षात घेऊन मी आपणा सर्वांना विनंती करतो की, प्रथम प्रश्नोत्तर होतील. प्रश्नोत्तराच्या आधी घेतले तर त्याचे गांर्भिय वाढणार आहे असे नाही. त्यामुळे मी सभागृहाला विनंती करतो की, प्रश्नोत्तरे झाल्यानंतर आपण तहकूबी मांडू त्यावर चर्चा करु आणि त्या संदर्भात निर्णय घेऊ.

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, तुम्ही गांर्भियाचा अर्थ असा सांगत असाल तर संपूर्ण सभा झाल्यानंतर तहकूब करा असे तुमचे म्हणणे आहे. गांर्भियाचा अर्थ असा आहे की, तुम्ही सर्व प्रथम तहकूबी घ्यायला पाहिजे.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.पिठासीन अधिकारी यांच्या आदेशानुसार आपण आता प्रश्नोत्तरं घेतोय. सर्व प्रथम सन्मा.सदस्य श्री. संजय वाघुले याचा पहिला प्रश्न आहे.

**श्री. संजय वाघुले :-**

मा. महापौर महोदय, मला माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे?

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आता तुम्ही सचिवांना प्रश्नोत्तर सुरु करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे त्यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरु केला आहे.

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, निष्पाप बालकांच्या निंदनीय हत्येच्या संदर्भात सभा तहकूबी मांडलेली आहे.

**मा.महापौर सो.**

सन्मा.सदस्य, श्री, घाडीगांवकर तुम्ही बोला.

**मा. महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, दुसरा प्रश्न श्रीम. मनप्रीत सिंग मॅडमचा आहे.

**श्रीम. मनप्रीत सिंग :-**

मा.महापौर महोदय, मी तीन महिन्यापूर्वी प्रश्न विचारला होता मला अजून त्याचे उत्तर मिळालेले नाही.

**श्री. संजय वाघुले :-**

सचिव, नक्की कोणाचे प्रश्न चालू आहेत. माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे? माझ्या प्रश्न क्र. २ सदर मलनि:सारण केंद्राच्या जमिनीवर महाराष्ट्र जीवन .. .. ..

**(सन्मा.सदस्य, श्री. मनोज शिंदे सभा तहकूबी वाचायला सुरुवात करतात.)**

**श्री. रामभाऊ तायडे :-**

मा.महापौर महोदय, एकीकडे सन्मा. सदस्य, पत्र वाचून दाखवत आहेत. तर दुसरीकडे प्रश्नोत्तरं चालू केली आहे. हे नक्की काय चालले आहे? आपण परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात बसलेलो आहोत. हया सगळ्या गोष्टी घटनेवर आधारीत आहेत असे असताना हे बरोबर आहे का ते आधी क्लीअर करा.

**श्री. मनोज शिंदे :-**

मा.महापौर महोदय, आधी तुम्ही तहकूबीवर निर्णय घ्या.

**श्री. संजय वाघुले :-**

मा. महापौर महोदय, माझा प्रश्न क्र. २ चे उत्तर ब्लँक ठेवलेले आहे. त्या जागेवर प्रत्यक्ष कोण अधिकारी गेले होते?

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, गेल्या वेळेस तुम्ही रुलींग दिल्यामुळे मी जागेवर शांतपणे बसलो. आता हया अजेंडयाबरोबर माझे पूर्वीचे प्रलंबित प्रश्न आहेत. तुम्ही पिठासीन अधिकारी म्हणून बसायच्या आधीपासूनचे माझे प्रश्न आहेत. इतिवृत्त मंजूरीला आलेत परंतू मला अजून उत्तर मिळाली नाहीत. माझ्या प्रश्नांची आणि आताच्या प्रश्नांची उत्तरं मिळाली नाहीत तरी प्रशासनाने खुलासा करावा. हे प्रश्न घेतले तर तुमची रुलींग चुकीची होईल. महापौर साहेब, हे प्रत्येक सदस्यांच्याबाबतीत घडतयं.

**मा.महापौर सो :-**

सभागृहाला अशी विनंती आहे की, सदस्य प्रश्न विचारतात आणि आपल्याकडे प्रश्नोत्तरासाठी ठरावित वेळ दिला जातो. त्यामुळे अनेक सदस्यांचे प्रश्न अनुत्तरीत राहतात. ते प्रश्न खरंतर याच महासभेत घ्यायचे होते परंतू पुढच्या सभेपासून जे शिल्लक प्रश्न आहेत त्यांचा आधी क्रम राहील आणि त्याप्रमाणे आपण पुढचे प्रश्न घ्यायचे आहेत.

**श्री. संजय भोईर :-**

मा.महापौर महोदय, मागच्या सभेच्या वेळी तुम्ही सांगितले होते आणि विनंतीही केली होती की, तुमचे प्रश्न पुढच्या महासभेला घेतले जातील. मग ते हया महासभेला घेतले पाहिजेत.

**मा. महापौर सो. :-**

ठिक आहे, ते प्रश्न आधी घ्या.

**मा. विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, ते प्रश्न आधी घेणार बरोबर आहे पण त्यासाठी किती वेळ देणार हे सुध्दा सांगा.

**मा.महापौर सो.**

त्यासाठी सुध्दा अर्धा तास.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आता माझे प्रश्न घ्या. इतिवृत्त आता मंजूरीसाठी आले आहे त्यात माझे प्रश्न प्रलंबित आहेत. साहेब, तुमची रुलींग आहे.

**मा. महापौर सो. :-**

घाडीगांवकर साहेब, विनंती आहे आता घेतले आहे त्यापासून सुरु करु.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

साहेब, तुमच्या आदेशाला माझी हरकत नाही. परंतू माझे म्हणणे एवढेच आहे की आपली रुलींग चुकीची होतेय. तोच मग वाद निर्माण होईल.

**श्री. संजय वाघुले :-**

मा.महापौर महोदय, माझ्या प्रश्न क्रमांक २ चे उत्तर दिलेले नाही. मुबईकर साहेब, प्रश्न विचारुन एक महिना झाला आहे. हया एक महिन्यात आपल्या विभागाला त्या मलनि:सारण केंद्राच्या ठिकाणी जायला वेळ मिळाला नाही का? म्हणजे उत्तर का दिले नाही?

**श्री. मुंबईकर, कार्यकारी अभियंता, मलनि:सारण विभाग :-**

मा.महपौर महोदय, सदर विभागाचा चार्ज मी आताच घेतला आहे. याची प्रश्नाची माहिती मी स्वत: घेऊन दोन दिवसांत आपणांस देतो.

**श्री. संजय वाघुले :-**

तुम्ही आता चार्ज घेतला म्हणजे नक्की कधी चार्ज घेतला? म्हणजे आज सकाळी घेतला,काल घेतला नेमका कधी चार्ज घेतला.

**श्री. मुंबईकर, कार्यकारी अभियंता, मलनि:सारण विभाग :-**

मा.महापौर महोदय, मी २० तारखेला चार्ज घेतला.

**श्री. संजय वाघुले :-**

मा.महापौर महोदय, मी दिनांक १३ नोव्हेंबरला प्रश्न विचारला एक महिना झाला आहे. त्यावेळेला कोण अधिकारी होते.

**श्री. मुंबईकर, कार्यकारी अभियंता, मलनि:सारण विभाग :-**

साहेब, मी तुम्हाला दोन दिवसांत माहिती घेऊन देतो. ती माहिती स्थावर मालमत्ता विभागाशी संबंधित असल्यामुळे दिली नाही. मी स्वत: माहिती घेऊन तुम्हाला दोन दिवसांत देतो.

**श्री. संजय वाघुले :-**

मा. महापौर महोदय, माझा प्रश्न क्र. ४ ठामपाने रस्ता रुंदीकरणामध्ये सदर जागेत एकूण किती जणांना विस्थापित करण्यांत आले आहेत, त्याची नांवे सांगणे.

**श्री. मुंबईकर, कार्यकारी अभियंता, मलनि:सारण विभाग :-**

मा.महापौर महोदय, हया प्रश्नाची माहिती शहर विकास विभाग देऊ शकेल. ती माहिती माझ्याकडे नाही.

**श्री. संजय वाघुले :-**

मा.महापौर महोदय, उत्तराच्या शेवटी सहीच्या ठिकाणी उपनगर अभियंता, मलनि:सारण विभाग, कर निर्धारक व संकलक विभाग यांचा उल्लेख केला आहे. कर निर्धारक व संकलक यांनाही माहिती नाही तिथे किती जण आहेत त्यापैकी किती जणांना टॅक्स लागला आहे.

**श्री. मुंबईकर, कार्यकारी अभियंता, मलनि:सारण विभाग :-**

मा.महापौर महोदय, मी शहर विकास विभागाला कळविलेले आहे. माझ्याकडे ती माहिती उपलब्ध नाही.

**श्री. संजय वाघुले :-**

मा. महापौर महोदय, मी १३ नोव्हेंबरला प्रश्न विचारले आहेत. प्रश्न क्र. २ च्या ठिकाणी महाराष्ट जीवन प्राधीकरणाची तळ अधिक दोन मजल्याची इमारत आहे. मी प्रश्न विचारुन एक महिना झाला तरी आपल्या अधिका-यांना त्या ठिकाणी जायला वेळ नाही. त्या ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे चार ते पाच कर्मचारी राहत आहेत. इतर कर्मचारी तिथे राहत नाहीत. त्या ठिकाणी जुगाराचा अड्डा सुरु आहे, मद्यपान होत असते. आपल्याकडून त्या जागेवर जायला कुणाला वेळ नाही.

**मा.महापौर सो.**

संबधित अधिका-यांनी दोन दिवसांत अहवाल द्यावा असे मी आदेश देतो.

**श्री. संजय वाघुले :-**

ठिक आहे, कर निर्धारक व संकलक कोण आहेत? मला प्रश्न क्र. ४ चे उत्तर कोण देणार आहे? उत्तर जर शहर विकास विभागाशी संबंधित असेल तर शहर विकास विभागाच्या अधिका-यांना बोलवा.

**मा.महापौर सो. :-**

सहाय्यक संचालक येत आहे ते येईपर्यंत पुढचा प्रश्न घेण्यात यावा.

**श्री. संजय वाघुले :-**

शहर विकास विभागाचे अधिकारी येईपर्यंत माझा प्रश्न क्र. ४ राखून ठेवावे. माझा ५ वा प्रश्न असा आहे की, ठाणे महानगरपालिकेच्या जमिनीवर प्राधिकरणाच्या कर्मचा-यांकडून/इमारतीमध्ये राहत असलेल्या रहिवाशांकडून किती मालमत्ता कराची थकबाकी आहे ते कळविणे. याचे उत्तर मला कोण देईल?

**मा. विधी सल्लागार :-**

मा.महापौर महोदय, त्या संदर्भातील जी माहिती आहे ती मागवलेली आहे ती मी तुम्हाला देतो.

**श्री. संजय वाघुले :-**

मी प्रश्न विचारुन एक महिना झालेला आहे. तुमच्याकडे माझा प्रश्न कधी काल आला ? महापौर महोदय, प्रश्न विचारुन एक महिना झालेला आहे आणि हे सांगतात माहिती मागवून उत्तर देतो.

**मा.विधी सल्लागार :-**

महापौर महोदय, कर निर्धारक व संकलक पदाचा चार्ज माझ्याकडे कलच आला आहे. सन्मा.सदस्यांच्या प्रश्नाबाबत तातडीने माहिती घेतो.

**श्री. संजय वाघुले :-**

तुमच्याकडे कुठला चार्ज आला आहे?

**मा. विधी सल्लागार :-**

महापौर महोदय, दिक्षीत मॅडम आजारी आहेत. त्यांचा चार्ज माझ्याकडे आला आहे.

**श्री. संजय वाघुले :-**

महापौर महोदय, २५ दिवसांपूर्वी प्रश्न विचारला आहे. टॅक्स विभागाच्या लोकांना हया प्रश्नांचे उत्तर दयायला वेळ नाही का?

**मा. विधी सल्लागार :-**

महापौर महोदय, सन्मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीच संबंधित माहिती संकलीत करुन त्यांना एक आठवडयांत माहिती देतो.

**श्री.संजय वाघुले :-**

आम्ही महासभेत प्रश्न का विचारतो? तुम्हाला जर प्रश्नाचे उत्तर दयायचे नव्हते तर तुम्ही मला कालच पत्र देऊन कळवायचे होते उत्तर देणार नाही माहिती घरीच पाठवतो. मी पंचवीस दिवसांपूर्वी प्रश्न विचारला आहे. आपल्याकडे सचिव विभागाकडून पत्र जाऊन १० दिवस झालेले आहेत. प्रश्नाचे उत्तर देण्याची काळजी आपल्याला नाही का?

**मा.विधी सल्लागार :-**

सन्मा.सदस्यांना माहिती दयायची आहे. माझ्याकडे चार्ज पण नविनच आलेला आहे. या प्रश्नाची सगळी माहिती घेऊन .. .. ..

**श्री. संजय वाघुले :-**

सचिव विभागाकडून तुम्हाला पत्र कधी दिले?

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, जर त्यांच्याकडे चार्ज नविन आलेला आहे तर त्यांच्या खात्याकडे दुसरे कोणी खातेप्रमुख नसेल का? त्यांना तुम्ही बोलवा ना ते का उत्तर देऊ शकत नाही?

**श्री. गोदापुरे, उप कर निर्धारक व संकलक :-**

महापौर महोदय, मी उप कर निर्धारक व संकलक आहे. आपली परवानगी असेल तर दोन शब्द सांगतो. सन्मा. सदस्य आपण जी माहिती मागतली आहे ती माहिती अशी आहे की, ठामपाच्या जमिनीवर जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांकडून इमारतीमध्ये राहत असलेल्या .. ..

**श्री. संजय वाघुले :-**

माझा प्रश्न क्र. ५ मालमत्ता कराच्या थकाबाकीबाबत देईल.

**श्री. गोदापुरे, उप कर निर्धारक व संकलक :-**

मा.महापौर महोदय, हया प्रश्नाबाबत फक्त एकच बघुन चालणार नाही तर नऊ प्रभाग समितीमध्ये कुठे-कुठे हया प्रापर्टी आहेत .. ..

**श्री. संजय वाघुले :-**

महापौर महोदय, मी फक्त मलनि:सारण केंद्र क्र. २ चा प्रश्न केलेला आहे.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**श्री. गोदापुरे, उप कर निर्धारक व संकलक :-**

साहेब, प्रश्नामध्ये आपण ठामपाच्या जमिनीवर असे म्हटले आहे. म्हणून अजून बाकी ठिकाणी पण असतील म्हणून आम्ही नऊ प्रभाग समितीमध्ये माहिती संकलीत करण्यासाठी दिलेली आहे. ती लवकरांत लवक प्राप्त करुन घेऊन जसे काळे साहेब, म्हणाले त्याप्रमाणे आठ दिवसांत माहिती देतो.

**श्री. संजय वाघुले :-**

मा.महापौर महोदय, मी माझ्या प्रभागातील मलनिःसारण केंद्र क्र. २ च्या अनुषंगानेच बाकीचे प्रश्न विचारले आहेत. अख्या ठाणे शहरातील प्रश्न मी विचारलेले नाहीत.

**श्री. गोदापुरे, उप कर निर्धारक व संकलक :-**

साहेब, प्रश्नामध्ये ठामपा लिहील्यामुळे चुकीची माहिती देण्यापेक्षा ठामपा लिहील्यामुळे महापालिका क्षेत्रात जेवढया आहेत त्याची माहिती घेतोय. त्यामुळे साहेब तातडीने माहिती देतो.

**श्री. संजय वाघुले :-**

महापौर महोदय, ठिक आहे.

**म.महापालिका सचिव :-**

मा. पिठासीन अधिकारी यांचे आदेशानुसार दि. २०.११.२०१४ रोजी जी महासभा झाली त्या सभेतील प्रलंबित प्रश्न आता आपण घेतोय. सन्मा.सदस्या सौ. विशाखा खताळ यांचा प्रश्न आहे.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

सचिव, तुम्ही परत चुका करताय. मी तुम्हाला एवढं प्रेमाने सांगितले की, प्रश्नोत्तरे चालू होणार असतील तर प्रथम मला बोलू दया. परत तुम्ही माझे ऐकले नाहीत. तुम्ही मा. महापौरांना चुकीची माहिती देता. ॲक्चूली सचिव साहेब, तुमची चुकी आहे. तुम्ही महापौरांना व्यवस्थीत माहिती देत नाहीत. कारण प्रश्नोत्तराचे कामकाज तुम्ही बघता.

मा. महापौर महोदय, विषय असा आहे की, आचारसंहिते पूर्वी आपली जी शेवटची महासभा झाली. त्यावेळी आपलेही प्रश्न प्रलंबित होते आणि माझेही प्रश्न प्रलंबित होते. त्यावेळी मला स्पेसिफीक रुलींग दिली गेली आणि त्यावेळी वेती साहेबांनी उठून सांगितले होते त्यांची प्रश्न जेन्यूएन आहेत. त्यानंतर विरोधी पक्षनेते आणि सभागृह नेते बोलले की, हे प्रश्न राखून ठेवण्यांत यावेत तशी रुलिंग आहे. पाहिजे तर पान क्र. ३१,३२,३३ काढून बघा तसे रुलींग आहे.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा.सदस्य, घाडीगांवकर साहेब, आचारसंहिता नंतर जी आपली सभा झाली. त्याचे आणि आताच्या सभेतील प्रश्न आता इथे उपलब्ध आहेत. त्यामुळे आपणांस विनंती करतो की, आपले प्रश्न मी मागवून घेतो. त्यानंतर मग आपल्याला चर्चा करता येईल. तुमचे प्रश्न मी राखून ठेवतो. तुमचे कामकाज आपल्याला करता येईल.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

साहेब, तुमचा आदेश ओ.के. आहे मला मान्य आहे. त्याबद्दल काही वाद नाही. परंतू माझे म्हणणे असे आहे की, प्रशासन सातत्याने मी जे प्रश्न विचारले होते. तुम्ही जर पान क्र. ३१,३२,३३,३४ पाहिले तर तुमच्या लक्षात येईल की, पिठासीन अधिकारी यांनी आदेश दिले होते की, जर पुन्हा ही चुक घडली तर कारवाई घेतली जाईल. आता मला सांगा एप्रिलचे प्रश्नोत्तर ही अजूनपर्यंत मला मिळालेली नाहीत. मागची प्रलंबित आहेत. आताची प्रलंबित आहेत आणि माझ्याप्रमाणे इतर सदस्यांचे सुध्दा प्रलंबित आहेत. महापौर महोदय, तो प्रश्न आपल्या रेव्हेन्यूशी संबंधित आहे. महापालिकेच्या मालमत्तांशी संबंधित आहे. मी त्या संदर्भात पत्र व्यवहार सुध्दा केलेला आहे. परंतू हयांनी कारवाई न केल्यामुळे मी प्रश्न विचारलेत.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सदस्य, श्री. घाडीगांवकर यांची जी काही सूचना आहे. त्याचप्रमाणे इतर सदस्यांचे सुध्दा तेच म्हणणे आहे. त्यामुळे मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की, आज त्यांच्याकडे प्रश्न उपलब्ध नाहीत. म्हणून ज्या सदस्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत. त्यांची माहिती घेऊ आणि सदस्यांना विचारणा करु की, त्यांना त्यांचे प्रश्न घ्यायचे आहेत का? आणि घ्यायचे असतील तर त्या प्रश्नांच्या तारखेप्रमाणे त्यांचा अग्रक्रम ठरवून ते प्रश्न आपण पुढच्या महासभेत घेऊ. त्यामुळे विनंती आहे ते प्रश्न आपण पुढच्या महासभेत घेऊ.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

साहेब, तुमची विनंती आहे. माझी काही हरकत नाही. ठिक आहे.

**श्री. संतोष वडवले :-**

महापौर साहेब, मी ४.०८. च्या महासभेत प्रश्न विचारले होते त्या प्रश्नांची उत्तरं अजून मलाही मिळालेली नाहीत. मला प्रशासनाने अजून उत्तरं दिलेली नाहीत.

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सदस्य, श्री. वडवले साहेब, सदस्यांना जर प्रशासनाकडून नीट माहिती मिळत नाही म्हणून आपण महासभेत प्रश्नोत्तर विचारता आणि त्याची उत्तरं मिळावीत म्हणून मी प्रशासनाला आदेश देतो की, सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर संबंधित खात्याकडे सात दिवसांत पहिली माहिती महासभा कधीही लागो. परंतू पत्र मिळाल्यानंतर सात दिवसांत ती माहिती त्या त्या सदस्यांकडे गेली पाहिजे असे झाले नाही तर संबंधित अधिका-यांवर कारवाई करावी असे स्पष्ट आदेश मी प्रशासनाला देतो.

**मा. विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, मी आपल्या माध्यमातून सचिवांना विनंती करेन की, प्रश्नोत्तर विचारणं आणि या सभागृहात प्रश्नोत्तरं घेणं हा पिठासीन अधिकारी म्हणून महापौरांचा अधिकार आहे हे मी मान्य करतो. परंतू प्रश्नोत्तरां संदर्भात आपल्या कायदयात काय तरतूद आहे? कोणते प्रश्न विचारावेत अशी तरतूद आहे. या संदर्भात यापूर्वीही माझ्या माहितीप्रमाणे सभागृहात चर्चा झालेली होती. परंतू आताच महापौरांनी त्यांच्या निवेदनात सांगितले की, जेवढे प्रश्न प्रलंबित असतील ते सर्व प्रश्न आम्ही क्रमाने घेऊ. तर मुळात प्रश्नोत्तरासाठी आम्ही वेळ किती देऊ शकतो आणि प्रश्नाचे स्वरुप काय असावे? याबाबत कायदयात काय प्रोव्हीजन आहे?

**मा.महापालिका सचिव :-**

मा. महापौर महोदय, सन्मा.विरोधी पक्षनेते साहेबांनी प्रश्नोत्तरासंबंधात जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत कामकाज नियमावलीतील पान क्रमांक २८ व २९ मधील तरतूद .. ..,

**(मा.महापालिका सचिव, महापालिका कामकाज नियमावलीतील पान क्र. २८ व २९ वरील वाचून दाखवितात.)**

**श्री. नजीब मुल्ला :-**

महापौर महोदय, सचिवांनी पान क्र. ३० (१२) पासून प्रश्नांची परवानगी नाकारणे ते वाचून दाखवावे.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा. महापौर महोदय, सन्मा.सदस्य, श्री. नजीब मुल्ला यांनी सुचविल्याप्रमाणे ते सुध्दा वाचून दाखवावे. पण आता जे सचिवांनी वाचले त्याचे अवलोकन होते का? आमची प्रथा काय असते. सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर तो प्रश्न कोणाकडे जातो आणि आता तुम्ही जे वाचले त्याप्रमाणे त्या प्रश्नांची छाननी कोणी करतो का? हया विषयाचे अवलोकन होते का? आणि जर अवलोकन होत नसेल तर नियमात नसणारे प्रश्न या सभागृहामध्ये चर्चेले गेल आणि सभागृहाचा वेळ गेला तर, सभागृहनेते नाहीत का? कारण

त्यांनी सांगितले होते सभागृहाचा वेळ जाऊ नये. म्हस्के साहेब, आपल्या विनंतीला आम्ही मान देतो आणि आपल्या सूचनेचा सुध्दा आम्ही आदर करतो. या ठिकाणी अशाप्रकारे सभागृहाचा वेळ बराच वेळेला वाया गेलेला असेल आणि त्याच्यामुळे आता आपण जे चार मुद्दे या ठिकाणी वाचले. त्यानुसार प्रश्नांची छाननी होऊन महापौरांकडे अशाप्रकारचे प्रश्न जातात का आणि तसे प्रश्न आजपर्यंत गेलेले आहेत का?

**महापालिका सचिव :-**

मा.महापौर साहेब, आता जे नियम या ठिकाणी वाचण्यात आले आहेत. या नियमांची माहिती संबंधित विभाग प्रमुखांना सुध्दा आहे. एवढया बारकाईने छाननी होते असे मी म्हणणार नाही. पंरतू ब-याच वेळा जे विभागप्रमुख आहेत ते ही या नियमांच्या आधारे आम्हाला मार्गदर्शन करतात की, या नियमांचे उल्लंघन होत आहे. जे विभागप्रमुखांना प्रश्न विचारले जातात.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

महापौर महोदय, मला आश्चर्य वाटते आपल्या काळात सचिव सभागृहामध्ये अशाप्रकारे उत्तर देतात. इतर वेळेला ठिक होते. परंतू आपल्या काळात अशाप्रकारचे उत्तर सचिवांनी दयावे मला खरोखर आश्चर्य वाटते. सचिवांनी आता काय म्हटले ते आपण आताच ऐकले. महापौर साहेब, हे प्रश्न जर चुकीचे प्रश्न असतील तर सभागृहामध्ये असे प्रश्न घेता कशाला? हे प्रश्न तुम्हाला मागे घ्यावे लागतील.

**मा. महापौर सो.**

मा.विरोधी पक्षनेते साहेब, साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला. आपण जेष्ठ आहात आपल्याला सर्व नियमांची माहिती आहे. तसेच इतरही ब-यास सदस्यांना माहिती असेल. परंतू सदस्यांना एखादय प्रश्नाची उकल करायची असेल तर ते प्रश्न विचारतात. परंतू त्या प्रश्नाचे उत्तर हे त्या नियमानुसार देता येते की, नाही याबाबत त्या त्या अधिका-यांनी त्या त्या प्रश्नासमोर स्पष्ट लिहायचे की हा प्रश्न या या नियमात बसत नाही त्यामुळे याचे उत्तर देता येत नाही. त्यामुळे प्रश्न संपला.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

सन्मा.सदस्यांना प्रश्न विचारायचा अधिकार आहे. त्यांना त्याच्या प्रश्न विचारण्याच्या अधिकारापासून आपण त्यांना वंचित ठेवू शकत नाही. परंतू सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर आपण तो प्रश्न अजेंडयावर घेताना तो या नियमामध्ये बसतो हे पाहिल्यानंतर तो प्रश्न अजेंडयावर घ्यायला पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, कायदयात तसं म्हटलेलं आहे. मा.महापौर महोदय, सन्मा. विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो चुकीचा असेल तर विधी सल्लागार किंवा सचिवांनी या संदर्भात कायदयाच्याअनुषंगाने माहिती दयावी. वेळमर्यादा किंवा कुठले प्रश्न विचारता येतील, १२ मध्ये तर प्रश्न नाकारण्याचा जो अधिकार आहे त्याचा सुध्दा उल्लेख केलेला आहे. आपल्याला सदस्यांना सांगावे लागेल की, अमुक-अमुक प्रश्न या कायदयाच्या अनुषंगाने अजेंडयावर घेता येत नाहीत.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, मघाशी मी जे वक्तव्य केले की, सचिवांची जबाबदारी आहे. याबाबत आयुक्त गुप्ता साहेबांच्या उपस्थितीमध्ये आणि पाटील साहेब पिठासीन अधिकारी होते. हयाप्रमाणे जर कामकाज झाले नाही तर संबंधितांविरुध्द कारवाई घेऊ. आणि प्रश्न कुठले काय हा एक मुद्दा आणि दुसरा मुद्दा असा की, उत्तराबाबत सुध्दा त्यांनी एक रुलींग दिले आहे की, मी ते बरोबर घेऊन आलो आहे ते वाचून दाखवितो. म्हणून मी तुम्हला मघाशी विनंती केली होती की, त्यांचे चालू होण्या आगोदर मला बोलू दया आणि मग चालू करा. कारण काय होतयं, वातावरणामुळे रुलींग सतत डिर्स्टब होत आहे आणि दुसरा मुद्दा असा होतो की, सचिवांकडून ज्यावेळी कामकाज चालू केले जाते ते चुकीचे कामकाज असते. सचिव

विसरले की, माझ्याच पिटीशनमध्ये मा. आयुक्त महोदयांना कॉल करुन विडथ् सेक्रेटरी १ ने ॲफिडेव्हीड फाईल केलेले आहे. मग आज ते ॲफिडेव्हीड खोट आहे आणि हे रुलींग जे झाले आहे याच्या पुढील कारवाईस कोण जबाबदार आहे ते सचिवांनी सांगावे. ॲफिडेव्हीड दाखल केले आहे आणि आता कोर्ट कंन्टेम झाला आहे त्याचे तुम्ही काय करणार? मी सातत्याने सांगत होते तुम्ही चुकीचे कामकाज करु नका. महापौर महोदय, विधी सल्लागारांनी याबाबत निवेदन करावे. तुमच्या हया कामकाजाच्या पध्दतीमुळे तुम्ही पिठासीन अधिका-यांना गोत्यात आणता आहात.

**मा.महापालिका सचिव :-**

सन्मा.सदस्यानी पान क्र. ३० नियम १२ बाबत जो मुद्दा उपस्थित केला आहे. प्रश्नास परवानगी नाकारणे. (सचिव नियम वाचून दाखवितात.)

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा कोणत्या प्रकारचे प्रश्नोत्तर घ्यावीत आणि कोणत्या प्रकारची घेऊ नयेत किंवा फेटाळावीत याबाबत मी सचिवांना स्पष्ट आदेश देतो की, जे प्रश्न येतील ते योग्य त्या निकषाप्रमाणे असतील तेच प्रश्न आपण यापुढे घेऊ या.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा. महापौर महोदय, कायदा यापुढे कधीही नसतो. कायदा हा आज आतापासून असतो. साहेब, या आधी जो प्रश्न विरोधी पक्षनेते जगदाळे साहेबांनी विचारला आहे त्याचा खुलासा दयावा की, आजचे प्रश्न कायदयाला धरुन आहेत का?

**मा.महापौर सो. :-**

हा मुद्दा माझ्याकडे आज उपस्थित झाला आहे त्याप्रमाणे मी त्यांना आदेश देतोय.

**श्री. नजीब मुल्ला :-**

महापौर महोदय, विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या निदर्शनास आणून दिले आहे. त्याबाबत आपण उत्तर दया की, सर्व प्रश्नोत्तरं कायदयाला धरुन आहेत. तशी रुलींग दया आम्ही चुकलो असेल तर .. ..साहेब, पुढची प्रश्नोत्तर कशी घेता येतील. आधी हयाची रुलींग दया.

**मा. महापौर सो. :-**

मी रुलींग दिलेलं आहे.

**श्री. नजीब मुल्ला :-**

मा.महापौर महोदय, यापुढे हे रुलींग होऊ शकत नाही. आम्ही आपल्याकडे आक्षेप नोंदविलेला आहे. मा.विरोधी पक्षनेत्यांनी कायदयाप्रमाणे असलेल्या आपल्या प्रश्नात्तरामध्ये असलेल्या त्रृटी आपल्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. साहेब, त्याबाबत निर्णय घ्या की, आजच्या सभेत उपस्थित केलेले प्रश्न योग्य आहेत की, नाही. हो की नाही ते सांगा. आपले रुलींग दया. मिनिटस् करुन घ्या झाले.

**मा.महापौर सो. :-**

सन्मा.सदस्य, श्री. नजीब मुल्ला यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. यापुढे .. ..

**श्री. नजीब मुल्ला :-**

महापौर साहेब, कायदा कधीही यापुढे नसतो. कायदा आज आतापासून असतो.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

**मा.महापौर सो. :-**

अहो तुम्ही मला माझे वाक्य तर पुर्ण करुन दया. आमच्या पेक्षा तुम्ही खुप हुशार आहात माहिती आहे. पाच मिनिटं जरा ऐका. मी काय बोलतोय तुम्हाला माहिती आहे का? नाही ना. मग खाली बसा.

**श्री. नजीब मुल्ला :-**

साहेब, आमची विनंती आहे, आजच्या सभागृहात उपस्थित झालेल्या प्रश्नोत्तरांबाबत बोला. विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या निदर्शनास आणून दिले की, आजचे प्रश्न कायदयाला धरुन आहे का?

**मा.महापौर सो. :-**

तुम्ही मला बोलून तर दया. माझ्या पुढे हया आताच्या दोन सभामध्ये जे प्रश्न आले आहेत त्यांना ही तोच निकष लावावा.

**श्री. नजीब मुल्ला :-**

यापुढे निकष लावत असताना साहेब, तुम्ही प्रश्नोत्तरं कशी काय घेऊ शकता?

**मा.महापौर सो. :-**

निकषामध्ये असतील तीच प्रश्नोत्तर आपण घ्यायची.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा.महापौर महोदय, या ठिकाणी मी आपण अभिनंदन करेन. यापुढे आपण जो नियम लावलेला आहे. त्याबाबत कुठल्याहीप्रकारे दुमत नाही. परंतू सन्मा.सदस्य श्री. नजीब मुल्ला यांनी या ठिकाणी सांगितले कायदा हा कधीही यापुढे नसतो. जर अशा काही चुका झाल्या असतील आणि कोणी असे प्रश्न विचारले असतील आणि सभागृहामध्ये एखादा निर्णय झाला असेल तर निश्चितप्रकारे त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे.

**मा.महापौर सो. :-**

आता तेच सांगितले ना.

**मा. विरोधी पक्षनेते :-**

सांगितले ना? मग सचिव कारवाई व्हायला पाहिजे. मागच्या प्रश्नांचे सुध्दा.

**श्री. अशोक वैती :-**

सचिव, राहिलेले प्रश्न पुढे घेणार ना? प्रश्नोत्तरासाठी थोडा जास्त वेळ दयायला पाहिजे कारण मागचे सुध्दा प्रश्न राहिलेले आहेत. कारण महापालिका डबघाईला का आली त्याबाबतचे प्रश्न त्यात आहेत. ते प्रश्न पुढच्या वेळी प्राधान्याने घ्या.

**महापालिका सचिव :-**

सन्मा.सभागृह, प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. मा.पिठासीन अधिकारी यांचे आदेशानुसार आजच्या सभेसमोर दोन सभा तहकूबी प्राप्त झालेल्या आहेत.

महापौर
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. आणि या तासाभरात एकच प्रश्न झाला. बाकी सगळा प्रशासनाचा खुलासाच झाला. दुसरा मुद्दा असा की, माहे एप्रिलमध्ये माहे फेब्रुवारीच्या इतिवृत्तामध्ये सुध्दा आहे जे आता कायम करण्यासाठी आलेले आहेत. मा.आयुक्त महोदयांनी सांगितले होते की, प्रश्न जरा संबंधित विभागाने प्रलंबित ठेवले किंवा उत्तरं दिली गेली नाहीत तर संबंधित अधिका-

यांवर विभाग प्रमुखांवर कारवाईचे धोरण सभागृहासमोर मांडू. तत्कालीन पिठासीन अधिका-यांनी महापौरांनी त्यावेळी रुलींग दिले होते. आणि त्यावेळी तात्वीक वाद झाला होता. आणि धोरण नक्की करायला सांगितले होते की, ज्या विभागाकडून प्रश्नोत्तर प्रलंबित राहतील त्या संबेधित अधिका-यावर त्याच महासभेत तात्काळ कारवाई जाहिर केली जाईल हे रुलींग दिले होते. मी काय म्हणतोय ते आपल्या लक्षात आले असेल. जेणेकरुन हे वाद होणार नाहीत. दुसरे असे की, सभाशास्त्रामध्ये जी तरतूद आपण दिलेली आहे. जर त्याच्यामध्ये काही बदल अपेक्षित असतील जेणेकरुन प्रशासनाला अडचणीचे असतील आणि कामकाज सुरळीत व्हायला पाहिजे. तर त्याबाबतही सुधारीत सादर करावे. म्हणजे ही जी चर्चा होतेय वादळ होते ते होणार नाही. महापौर महोदय, ही माझी सुचना आहे. या पध्दतीने सचिवांनी कामकाजावर लक्ष दयावे. आणि आधी ऐकायची भुमिका ठेवावी. लगेच चालू होऊ नये. आणि यापुढे प्रशासनाचा खुलासा प्रश्नोत्तरांमध्ये काऊंट करु नये. त्यामुळे सदस्यांवर अन्याय होतो. उत्तर देत नाहीत, खातेप्रमुख जागेवर नसतात त्यामुळे आम्हाला उत्तरं मिळत नाही. मग लेखी उत्तर देऊ असे सांगितले जाते परंतू आजपर्यंतच्या इतिहासत कोणलाही महापौर साहेब तुम्हालाही माहिती आहे. लेखी उत्तर कोणालाच दिली जात नाहीत. महापौरांचे आदेश हयांनी पाळलेले नाहीत हे या सभागृहाने पाहिलेले आहेत. कोणालाही खुलासा आजपर्यंत प्रशासनाने दिलेला नाही. मग प्रश्नोत्तरं असो, सभा तहकुबी असो किंवा लक्षवेधी असो. आयज्यावेळचा विषय असो. कुठल्याही विषयावर लेखी खुलासा दिलेला नाही आणि सर्वात महत्वाचा विषय आहे की, विषयपत्रिका चालू करणार त्यावेळी प्रस्तावाच्या सूचनांबाबत आयुक्त गुप्ता साहेबांनी स्पष्ट सांगितले होते की, गेल्या तीन महिन्यांमध्ये जेवढया सदस्यांच्या सूचना आलेल्या आहेत आणि पुढे येतील त्यांच्यावर प्रलंबितबाबत तीन महिन्यात कारवाई होईल. आणि त्याच्या पुढे जी येईल त्याचीही कारवाई तीन महिन्याच्या आत केली जाईल. सभागृहाने जो ठराव केला आहे तो प्रशासनाने मान्य केला आहे की, तो ठराव विखंडीत करणार आहेत याची माहिती देतील. पण ती माहिती सुध्दा दिलेली नाही. देण्यात यावी असे आदेश दयावेत तसे महापौरांनी रुलींग दयावे आणि मा. आयुक्तांचा खुलासा घ्यावा. माळवी साहेब, आता आयुक्त म्हणून त्या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांनी उत्तर दयावे.

**श्री. माळवी, उप आयुक्त (मु.) (प्रभारी मा.आयुक्त सो.) :-**

मा.महापौर महोदय, सन्मा. सदस्य, श्री. घाडीगांवकर यांनी जी सुचना या सभागृहात मांडलेली आहे. त्याबाबत मा.आयुक्त साहेबांनी तीन महिन्याच्या आत प्रस्तावाच्या सुचनांबाबत जे सांगितले होते. त्या सर्व प्रकरणांचा आढावा घेण्यांत येईल. त्या संदर्भात मा.आयुक्त महोदयांशी चर्चा करण्यांत येईल. ज्या ज्या विभागाने त्या संदर्भातील प्रस्ताव सादर केले नसतील त्या विभागांना मा.आयुक्तांच्या सहीने नोटीसा पाठविण्यांत येतील.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, आजच्या सभेसमोर दोन सभा तहकूबी प्राप्त झालेल्या आहेत. जी पहिली सभा तहकूबी आहे तीचे सूचक आहेत सन्मा.सदस्य श्री. रामभाऊ तायडे व अनुमोदक आहेत श्री. संभाजी पंडीत आणि दुसरी सभा तहकूबी देखिल त्याच विषयावर आलेली आहे. तिचे सूचक सन्मा.सदस्य श्री. संजय भोईर आणि अनुमोदक श्री. मनोज शिंदे साहेब. पहिली लक्षवेधी सन्मा. सदस्य श्री. रामभाऊ तायडे साहेबांची आलेली आहे.

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

मा.महापौर महोदय, माझी लक्षवेधी या सभेपुढे वाचू असे आपण सांगितले होते त्याप्रमाणे ती सुध्दा वाचण्यांत यावी.

**(मा.महापालिका सचिव सभागृहात दोन्ही सभा तहकूबी वाचून दाखवितात.)**

सचिव
... महापालिका ठाणे.

दिनांक :- १८/१२/२०१४

<u>सभा तहकूबी</u>

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

विषय :- श्रध्दांजली अर्पण करुन दि. १९/१२/२०१४ रोजी होणारी
महासभा दिवसभरासाठी तहकूब करणेबाबत.

महोदय,

सप्रेम जयभीम/ जय महाराष्ट्र

दिनांक १६/१२/२०१४ रोजी पाकिस्तान मधील पेशावर शहरातील आर्मीच्या सैनिक शाळेमध्ये तालिबान दहशतवादयांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात जवळपास १४५ कुमार व किशार वयोगटातील मुले मृत्यूमुखी पडले आहेत. तसेच २५० विदयार्थी व शिक्षक जखमी झालेले आहेत. मानवतेला लज्जीत करणा-या या अत्यंत भ्याड हल्याचा जगभरातून निषेध होत आहे. जागतिक मानवता या घटनेने भयभीत झालेली आहे.

मानवतेच्या भावनेतून सदर घटनेचे गांर्भिय लक्षात घेऊन मृतांना श्रध्दांजली अर्पण करुन, सदर महासभा दिवसभरासाठी तहकूब करण्यांत यावी ही विनंती.

सुचक :- श्री. रामभाऊ तायडे — अनुमोदक :- श्री. संभाजी पंडीत

**मा.महापालिका सचिव :-**

यानंतर दुस-या सभा तहकूबी सुचक -सन्मा. सदस्य श्री. संजय भोईर आणि अनुमोदक- श्री. मनोज शिंदे आहेत ती मी वाचून दाखवतो.

दिनांक :- १७/१२/२०१४

<u>सभा तहकूबी</u>

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
यांस सस्नेह नमस्कार,

विषय :- बालकांच्या निघृण व निंदनीय हत्येच्या निषेर्धात श्रध्दांजली
वाहून सभा तहकूब करणेबाबत.

महोदय,

आपल्या राष्ट्राच्या शेजारी असलेल्या पाकिस्तानामधील पेशावर येथे तहेरिके तालिबान या अतिरेकी संघटनेच्या सैतानांनी मंगळवारी निरपराध बालकांचे निघृण हत्याकांड केले. सदर बालके उपरोक्त ठिकाणी सैनिकी शाळेमध्ये शिक्षण घेत होते. शिक्षणासारख्या पवित्र व शांत ठिकाणी निरगस अशा या बालकांची हत्या करुन रक्तपात घडवला या हल्ल्यात शाळेतील १३२ विद्यार्थी, ९ कर्मचारी असे एकूण १४१ जण ठार व २४५ जण जखमी झाले. माणुसकीला काळिमा फासणा-या या अमानुष हल्ल्याचा जगभरातील नेत्यंनी धिक्कार केला आहे व ते योग्यच आहे. अशा या कठिण प्रसंगी जगातील प्रत्येक शांतताप्रिय व्यक्ती, संस्था व देशांनी या संपूर्णपणे निंदनीय घटनेचा निषेध करुन अतिरेकी संघटनांच्या विरुध्द एकी दर्शविणे गरजेचे आहे.

सबब या अमानुष व निघृण हत्येचा येत्या दिनांक १९/१२/२०१४ रोजीच्या महासभेत संपूर्णपणे निषेध करुन या हल्ल्यात मृत पावलेल्या बालकांना श्रध्दांजली वाहून तसेच जखमी झालेल्या व सर्व संबंधितांच्या कुटूंबाच्या दु:खात ही महासभा सहभागी होणेस व त्यांच्या निषेर्धात दिनांक १९/१२/२०१४ रोजीची सर्वसाधारण सभा तहकूब करण्यांत यावी हि विनंती.

सुचक :- श्री. संजय भोईर — अनुमोदक :- श्री. मनोज शिंदे

**श्री. रामभाऊ तायडे :-**

मा. महापौर महोदय, आम्ही जी सभा तहकूबी मांडली आहे. परवा पाकिस्तान येथे जो दहशतवादी हल्ला झाला. तेथील सैनिकी शाळेतील लहान-लहान मुलांवर एकाच वेळेस सहा दहशतवादयांनी गोळया झाडल्या. माझ्या माहितीप्रमाणे पंधरा मिनिटांतच १४५ जणाचा खातमा झाला त्यामध्ये शिक्षक सुध्दा होते. अडीचशे ते तीनशे लोक या घटनेमध्ये जखमी झालेले आहेत. महापौर महोदय, पाकिस्तानचा विषय आहे म्हणून आपल्याला दुर्लक्ष करुन चालणार नाही. आपल्याला पाकिस्तानशी काहीही देणे-घेणे नाही. आपल्याला त्या निष्पाप बालकांशी देणं-घेणं आहे. बालकं ही कुठल्यांही देशाची असू दया. मी माणसं आहेत आणि माणूसकीच्या दृष्टीकोनातून आपल्याला तो विषय घेणे गरजेचा होता. काही लोकांनी सांगितले पाकिस्थानने हे केले, पाकिस्तानने ते केले. परंतू या ठिकाणी पाकिस्तानचा विषयच येत नाही. फक्त पाकिस्तानची ती मुलं आहेत. निष्पाप बालकं आहेत म्हणून तो विषय आपण घेतलेला आहे. आपण पाकिस्तानच्या विरोधात आहोत. परंतू माणूसकीला काळिमा फासणारी ही जी घटना घडली त्या संदर्भात मी या ठिकाणी त्या दहशतवादयांचा निषेध करतो आणि मी जे पत्र दिलेले आहे की, दिवसभरासाठी सभा तहकूब करावी त्याबाबत मा. महापौरांनी निर्णय घ्यावा इथेच थांबतो. जय भिम.जय भारत.

**श्री. संभाजी पंडित :-**

महापौर महोदय, पाकिस्तान मधील पेशावर येथे तहेरिके तालिबान या अतिरेकी संघटनेने जो लहान बालकांचा संहार केलेला आहे त्याचा आम्ही या ठिकाणी निषेध करतो. व त्यासाठी सन्मा.सदस्य श्री. रामभाऊ तायडे यांनी सभा तहकूबी मांडलेली आहे. त्या सभा तहकूबीला मी समर्थन देतो. पण सभागृहाचा वेळ सुध्दा महत्वाचा आहे. म्हणून मा.महापौरांनी कमित कमी एक तासाची तरी तहकूबी दयावी ही विनंती.

**श्री. संजय भोईर :-**

महापौर महोदय, पाकिस्तानमधील पेशावर या ठिकाणी सैनिकी शाळेमध्ये अतिरेकी हल्ल्यामध्ये निष्पाप मुलांच्या डोळयामध्ये आणि डोक्यामध्ये गोळया घालून त्यांची हत्या केलेली आहे. या घटनेचा निषेध जगभर सर्वत्र केलेला आहे. कोणत्या देशात घटना घडली ते महत्वाचे नाही. देशासाठी लढणा-या सैनिकांची मुलं त्या सैनिकी शाळेत जातात हया शाळेमध्ये घुसुन त्या बालकांची हत्या केली आहे. त्या बालकंच्या समोरच त्यांच्या शिक्षकांना ही जाळले. अशाप्रकारे क्रुर हत्या त्या ठिकाणी केल्या आहेत. म्हणनू आम्ही विनंती केली की ज्या बालकांची गोळया घालून हत्या केली त्याच्या निषेधार्त ही महासभा दिवसभरासाठी तहकूब करावी. लहान-लाहन मुलं कुणाची आहेत आणि कुठली आहेत हे न पाहता ज्यांच्यावर हल्ला झाला त्याला महत्व देऊन जर आपल्या भारतामध्ये अशाप्रकारचा हल्ला झाला असता आणि आपल्याकडील सैनिक शाळा असतील किंवा आणखीन कुठल्या शाळा असतील अशा शाळांमध्ये जाऊन अतिरेक्यांनी हल्ला केला असता तर आपण आपल्याच मुलांवर अशाप्रकारचा हल्ला झाला आहे अशी भावना ठेवली असती. महापौर महोदय, जरी पाकिस्तानमध्ये हल्ला झाला असला तरी मुलं ही मुलं आहेत आणि अतिरेक्यांनी अतिरेक्यांना मारलं म्हणून इथे आपण निषेध करत नाही तर लहान मुलांच्या हत्या झाल्या आहेत म्हणून आपण त्याच्या निषेधार्थ या ठिकाणी ही सभा तहकूब करायला सांगितली आहे. जशी आपली मुलं आहेत तशी त्यांची मुलं आहेत. त्यामुळे आपणांस विनंती आहे की, ही सभा पूर्ण दिवसासाठी तहकूब करावी.

अधिकारी
ठाणे महानगरपालिका ठाणे

**श्री. मनोज शिंदे :-**

महापौर महोदय, आपल्या राष्ट्राच्या शेजारी असलेल्या पाकिस्तानमधील पेशावर येथे तहेरिकी तालिबान या अतिरेकी संघटनेने मंगळवारी निष्पाप बालकांनी निघृण हत्या केली. कधी काळी हा पाकिस्तान हे पेशावर शहर आपल्या भाऊबंदीमध्ये असलेला देश होता. आज अशाप्रकारे काळिमा फासणारा प्रसंग संपूर्ण जगभरामध्ये प्रथमतःच झालेला आहे. मुलं ही देवाघरची फुल असतात. अशाप्रकारे निघृण हत्या करणा-या तहेरिके तालिबान या अतिरेकी संघटनेला काळिमा फासण्यासाठी माझे मित्र सन्मा. सदस्य, श्री. संजय भोईर यांनी सभा तहकूबी मांडली आहे. या देशावर हत्या करण्याचे षडयंत्र अनेक वर्ष

निंदा करतो. महापौर महोदय, आपल्याला बरेच कामकाज करायचे आहे. मला माहिती आहे सभागृहाची अशी पण भावना आहे की, आपले बरेचसे कामकाज थांबलेले आहे. अजेंडयावर बरेच विषय आहेत. काही दिवसांपूर्वी सिडनीमध्ये कॅफेमध्ये अशाप्रकारचा हल्ला झाला. परंतू त्याची निंदा एवढया स्तरावर झाली नाही. पण हा जो हल्ला झाला तो खरेखर आपले डोळे उघडण्यासारखा होता.

मा.महापौर महोदय, हया सभा तहकूबीच्या माध्यमातून शिक्षण विभागाने फक्त प्राथमिक शाळा नव्हे, महापालिकेच्या माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा जे कॉलेज आपल्या हया ठाणे शहरात असतील त्या सर्वांचे आराखडे आपण मागवून घ्यावेत. अधिकृत असेल अनधिकृत असेल जे काही असतील पण जागेवर प्रत्यक्षपणे असतील महापौर महोदय, घटना कधीही कुठेही घडू शकते. आज आपण आराखडे मागवून ते संबंधित पोलीस स्थानकाकडे उपलब्ध करुन दिले तर कुठेही डिझास्टर मॅनेजमेंटमार्फत काही घटना घडली तर कुठल्या मार्गाने कुठे जायचे हयाची जाणीव तिथल्या अधिका-यांना असेल त्यामुळे काम करायला किंवा संरक्षण करायला मदत होऊ शकेल. शाळेच्या सुरक्षा रक्षकांचा मुद्दा आपल्या समोर उपस्थित झाला आहे खरोखर त्याबाबत लक्ष घालणे गरजेचे आहे. पण महापौर महोदय, ज्यांनी सूचना केली अनुमोदन केले त आमचे या सभागृहातील चार सदस्य. मला माहिती आहे आपल्याला सभा चालवायची आहे, बरेचसे विषय संपवायचे आहेत. पण अशी निंदनीय घटना घडल्यावर लोकसभेमध्ये त्याबाबत निंदा केली जाते, तिथे तहकूबी मांडली जाते. आपण या संविधानाचे सर्वात खालच्या स्तरावर काम करणारे हे सभागृह आहे. तेंव्हा तिथे सभा तहकूबी मांडली जाते, तिथे निंदा केली जाते. आज सभा आपण दोन वाजता सुरु केली आता काही अंशी तास शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे श्रध्दांजली म्हणून आपण ही सभा पूर्ण वेळ तहकूब करावी अशी मी आपणांकडे सुचना करतो. ज्या आईने आपल्या मुलाला गणवेश घालून शाळेत पाठवले आणि रात्रीपर्यंत त्याची वाट बघत होती. महापौर महोदय, आपल्याकडे एक म्हण आहे, सर्वात वजनदार शवपेटी कुठली असेल तर ती सर्वात लहान शवपेटी सर्वात वजनदार असते. ही म्हण आहे आणि या म्हणीला श्रध्दांजली म्हणून काही तासासाठी उरलेली महासभा आपण संपूर्ण दिवसासाठी तहकूब करावी आणि तातडीने उदयाच बोलवावी जेणेकरुन आपले कामकाज आपल्याला पूर्ण करता येईल. अशी विनंती मी आपल्याकडे त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी करतो आणि आपली रजा घेतो. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

**श्रीमती उषा भोईर :-**

महापौर महोदय, १६ डिसेंबर सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी पाकिस्तानमधील पेशावर येथे झालेली क्रुर हत्या त्या दिवशी जी घटना घडली मला वाटते बोलण्यासाठी शब्द सुध्दा राहिले नाहीत अशी घटना घडली. ज्यावेळी आम्ही टी.व्ही.वर लाईव्ह बघत होतो. लहान लहान मुलांना हातात उचलून जात होते. या ठिकाणी मी एवढंच सांगेन एक आई आपल्या मुलाला आपल्या उदरात वाढवते आणि त्यानंतर ती आपल्या मुलाला मोठं करते. मुलं मोठ झाल्यावर तिची एवढीच इच्छा असते की, आपलं मुल मोठया शाळत जावे. प्रत्येकाची इच्छा असते की, आपलं मुल चांगल्या शाळेत जाऊन मोठा व्हावा, पदवीधर व्हावा. अशी प्रत्येक आईची इच्छा असते, स्वप्न असते. आणि त्या स्वप्नाचा जर दोन मिनिटांत चक्का चूर झाला तर त्या आईचे आयुष्यच संपून जातं. त्या ठिकाणी लहान लहान मुलांची गोळया घालून क्रुर हत्या केली. टी.व्ही. पाहत असताना काही लहान मुलांनी सांगितले की, मुलांना लाईनमध्ये उभे केले होते आणि त्यांच्या डोक्यामध्ये आणि डोळयामध्ये गोळया घातल्या. तसेच लहान मुलांच्या समोर त्यांच्या ज्या प्रिंसिपल होत्या त्यांना जाळले गेले. माणूसकीला काळिमा फासणारी अशी घटना घडलेली आहे. आपल्याकडे प्रत्येक वेळी अतिरेकी येतात आणि हल्ले करतात. मला वाटते त्यांना जात-पात काहीही नसते. त्यांना डोळेही नसतात. त्यांना एकच माहिती असते की, आम्हाला हत्या करायची आहे. हया लहान लहान मुलांना अजून त्यांचे आयुष्य बघायचे होते. आपण म्हणतो ज्ञान हा आपला तिसरा डोळा आहे परंतू हया लहान मुलांचा तिसरा डोळा अजून उघडला नव्हता आणि त्या आधीच त्यांचा स्वर्गवास झाला. अशी अतिशय क्रुर हत्या पाकिस्तानात घडली. आज या ठिकाणी जी सभा तहकूबी मांडली आहे. महापौर महोदय, या ठिकाणी कोणीही स्वर्गवासी झाले तर आपण सभा तहकूबी मांडतो. आज आपण कुठल्या देशात घटना घडली आहे त्याचा विचार या ठिकाणी करायचा नाही असा विचार केला तर त्यांच्यात आणि आपल्यात काहीच फरक राहणार नाही. आपण हिंदुस्थानी आहोत आपण त्या लहान-लहान मुलांचा विचार करु या. आपल्याला

महापौर

पाकिस्तानात कोणाचे घेणे-देणे नाही. मी जर आई आहे तर आई म्हणून आपणच मुलांची भावना जाणू शकतो. महापौर महोदय, आपल्या भारताची मुलं असती तर आपण दुखवठा पाळला असता. पण आपण जर संपूर्ण दिवसासाठी सभा तहकूब करावी कारण सभा संपण्यासाठी दोन-तीन तास राहिलेले आहेत. त्यामुळे आपण सभा तहकूब करणार अशी अपेक्षा करते आणि माझ्याकडून व माझ्या कुटूंबियांकडून आणि या आपल्या सभागृहाकडून मी श्रध्दांजली वाहते. धन्यवाद. जय हिंद , जय महाराष्ट्र.

**श्रीमती हफिजा नाईक :-**

महापौर महोदय, २६/११ आणि १६/१२ अशा घटना घडल्या आहेत. २६/११ मध्ये लहान-मोठे सर्वच सामील होते. १६/१२ मध्ये लहान खुप सामील होते. माझ्या मित्राने लिहीलेल्या काही ओळी या ठिकाणी ऐकवते.,

खून किसी का भी गया हो
खून किसीका भी गिरा यहा
किसीके छाती का सुकून है आखिर
आज कुछ बच्चे घर नही जाएगे
वह २६/१२ था आज १६/१२ है
कल धर्ती हमारी थी, हथियार तुम्हारे थे
आज धर्ती तुम्हारी है हथियार भी तुम्हारे है
हमे दुख कल भी था, हमे दुख आज भी है
कैसे होगी उस मॉ की हालत
जिससे बच्चेने कहा होगा आज स्कूल नही जाऊंगा
और उस मॉ ने उस बच्चे को दाट फटकार जबरदस्ती स्कूल भेजा होगा
कितना रोया होगा मॉ का दिल, यह एक मॉ ही जानती है
दो देशों की लढाई है ऐ , दो देशो के लढाईमें मासुम शहिद हो गये
उन मासुम शहिदोके लिए अगर हम यह सभा तहकूब करे तो बहुतही अच्छा होगा.
धन्यवाद.

**श्रीमती मालती पाटील :-**

महापौर महोदय, १६ डिसेंबर हा दुखाःचा दिवस होता. मघाशी जी चर्चा झाली की , पाकिस्तानमुळे भारतावर जे दुखःचे प्रसंग ओढावले त्यावेळी त्यांनी दुःख व्यक्त केले होते का? महापौर महोदय, हया पेक्षा महत्वाचे हे आहे की, जे दुःख ज्याच्यावर ओढावले आहे ती अत्यंत निष्पाप लहान मुलं आहेत. मुलं ही देवाघरची फुल असतात. त्यांना जात, पात, धर्म नसतो. एक स्त्रीच दुस-या स्त्रीचे दुःख समजू शकते. त्यामुळे हयाबाबतीत जर आपण आपलं दुःख व्यक्त केलं नाही तर मला वाटते एका स्त्री साठी ते खरंच अपमानकारक राहील. आज आम्ही वॉटस्‌अप्सवर ब-याच पिक्चर रिप्लाय देत असतो. पंरतू गेल्या दोन-तीन दिवसांत हया लहान मुलांचे जे फोटो बघत होतो तर ते बघितल्यानंतर लगेचच डिलीट करत हातो कारण ते बघायलाच होत नव्हते. त्यांची ती अवस्था बघून अतिशय वाईट वाटत होते. आपल्या मुलाला जरासे खरचटले तरी आपला जीव लगेलच कासावीस होतो. आपण लगेल त्यांच्यापाशी धावत जातोः आई मुलगा शाळेतून परत येईल म्हणून त्याची वाट बघत असते पण सांयकाळी त्या मुलाची जाळी झालेली बॉडी येत असेल तेंव्हा त्या आईची अवस्था काय असेल याचा जर आपण आज विचार केला तरी तो विचार इतका भयानक आहे की, तो आपण विचार सुध्दा करु शकत नाही. त्या आईला तिचे दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर देवो अशी मी या ठिकाणी प्रार्थना करते. महापौर महोदय, अशाप्रकारचा प्रसंग कुठल्याच आईवर येऊ नये यासाठी मी प्रार्थना करते. आज तिथे हा हल्ला झाला आहे इतरही ठिकाणी हल्ला करण्याची भुमिका असेल म्हणून असे काहीही कुठे होऊ नये यासाठी आपण आधीच काहीतरी तयारी करायला पाहिजे. किंवा एखादया ठिकाणी होते तर आपण ते बघतो किंवा त्याच्यावर चर्चा करतो. तर अशा गोष्टींकडे बघण्यापेक्षा किंवा चर्चा करण्यापेक्षा किंवा ब-याच वेळा असे होत की, कांही बाबतीत आपण चांगल्या गोष्टी या ठिकाणी सुचवित असतो. उदा. सुरक्षारक्षकांची संख्या वाढवा. मला वाटते जिथे नकोत तिथे पंधरा-पंधरा सुरक्षारक्षक असतात. परंतू जिथे त्यांची खरचं आवश्यकता असते तिथे मात्र एक किंवा

ठाणे महानगरपालिका ठाणे

दोनची संख्या असते. जिथे गरज असेल तिथे जास्तीत जास्त संख्या वाढवावी अशी मी आपणांस या घटनेच्या अनुषंगाने विनंती करते. महापौर महोदय, इथेच थांबते माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद, जय हिंद जय महाराष्ट्र. ओम शांती, ओम शांती.

**श्री. संजय वाघुले :-**

महापौर महोदय, आज हया ठिकाणी सन्मा.सदस्य, श्री. संजय भोईर, श्री. मनोज शिंदे, श्री. रामभाऊ तायडे व श्री. संभाजी पंडीत यांनी जी सभा तहकूबी मांडली त्या तहकूबीला पाठींबा देण्यासाठी मी उभा आहे. मंगळवार दिनांक १६/१२/०१४ रोजी पाकिस्तानमधील पेशावर शहरामध्ये तालिबान अतिरेकी संघटनेने सैनिकी शाळेमध्ये हल्ला केल्याने त्यामध्ये जे १४५ मुलं-मुली मृत्यूमुखी पडले आणि देशभरामध्ये दु:खाचे सावट कोसळले. या घटनेबाबत भारताने तिव्र शब्दात देशभरामध्ये याबाबत निषेध व्यक्त केलेला आहे. अनेक सन्मा.सदस्यांनी आजची ही सभा तहकूब करावी अशी महापौराना विनंती केलेली आहे. एक सूचना आहे की, अतिरेकी हा कुठल्याही जातीचा धर्माचा नसतो. हे त्यांनी अनेक प्रसंगातून दाखवून दिलेले आहे. संपूर्ण देशभरामध्ये हया अतिरेकी संघटनेने अनेक हल्ले केलेले आहेत आणि त्या हल्ल्यांचा निषेध ही सर्वसाधारण सभा या ठिकाणी करत आहे. हे अतिरेकी हे कुठल्याही धर्माच्या वास्तूमध्ये जाऊ शकतात. हे देवळामध्ये जातील, मसिदीमध्ये जातील, शाळेमध्ये जातील. कारण हया अतिरेक्यांना कुठलीही धर्म-जात नसते. आम्ही या ठिकाणी सदस्य म्हणून एक काळजी म्हणून नम्रता भोसले, सन्मा.सदस्या यांनी जी सूचना केली आहे की, शाळे महापालिकेच्या शाळा असो, खाजगी शाळा असोत. त्या ठिकाणी महापौर म्हणून ठामपाच्या हद्दीमध्ये जेवढया खाजगी किंवा महापालिकेच्या शाळांतील मुख्याध्यापकांना एक पत्र दयावे की, आपणही आपल्या शाळेच्या आवारात सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावून आपल्या विदयार्थ्यांची त्या ठिकाणी काळजी घ्यावी अशी मी आपणांस या ठिकाणी सूचना करतो आणि पेशावर हया ठिकाणी जो हल्ला झाला आहे त्याचा आम्ही सर्व सदस्य या ठिकाणी निषेध करतो. तसेच आजही ही सर्वसाधारण सभा श्रध्दांजली वाहून तहकूब करावी अशी प्रशासनाला विनंती करतो.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

मा.महापौर महोदय, सन्मा. सदस्य, श्री. रामभाऊ तायडे, श्री. संभाजी पंडित, श्री. संजय भोईर, श्री. मनोज शिंदे या सर्व सदस्यांनी श्रध्दांजली वाहण्याकरिता आणि अतिरेकी कारवायांच्या निषेध या अनुषंगाने सभा तहकूबी मांडली. प्रत्येक व्यक्ती आप-आपल्या प्रभागातील नागरिकांच्या वतीने किंवा सदनाचा सदस्य म्हणून या ठिकाणी श्रध्दांजली देतोय. या ठिकाणी सर्व सदस्यांनी आपल्या भावना मांडल्या की, अतिरेकी कारवायांना चेहरा नाही, जात-धर्म नाही. आपण या सदनामध्ये त्यांना श्रध्दांजली दयायची आहे. श्रध्दांजली दिली पाहिजे हे मानव म्हणून आपले आदय कर्तव्य आहे. आज त्यांची वेळ आहे आपल्यावर तर भरपूर वेळा वेळ येऊन गेलेली आहे. त्यांनी त्यांच्याकडे त्याबद्दल कदाचित दिवाळी साजरी केली असेल. पण हा भ्रत देश हा हिंदुस्थान सदैव शांतीचा प्रतिक आहे आणि या शांतीसाठी जगभरातून भारताचे नांव नेहमीच एक नंबरला राहिलेले आहे. शांती काय असते संयम काय असतो हे भारताने वेळोवेळी दाखवलेले आहे. आपल्या राष्ट्रपिता महात्मा गांधीजीनी दाखवलेले आहे. ज्यांच्या नावाच्या सदनात आज आपण बसलोय ते परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवलेले आहे. आज हया महाराष्ट्राच्या भूमीमध्ये हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी देखिल जाती-धर्म पाळला नव्हता. परंतू स्वराज्य मिळविण्यासाठी त्यांनी कुठलीही चुकीची कामे केली नाहीत. किंवा स्वातंत्र मिळविण्यासाठी आपण कुठलीही चुकीची कामे केली नाहीत. स्वातंत्र्यानंतर फाळणी झाली आणि पाकिस्तानची निर्मिती झाली. इंग्रज जाताना सुध्दा आपले दोन भाग करुन गेले आणि या पाकिस्तानातील राज्यकर्त्यांनी ते पेरले आज ते उगवले. आणि आज तरी त्यांचे डोळे उघडतील याबाबत शक्यता कमीच आहे. पण त्यांच्या देशामध्ये सुरुवात झाली आहे. अशाप्रकारची चित्र टि.व्ही. वर दाखवली जात आहेत. आज त्यांच्या नागरिकांना अतिरेकी कारवायांचा धसका काय असतो. त्या सैनिकांना त्यांच्या कुटूंबियांना सुध्दा समजले असेल. आज त्यांच्या घरातील लहान लहान मुल अशाप्रकारे मारली गेली आहेत. परंतू त्या लहान लहान मुलांना या ठिकाणी श्रध्दांजली देताना, आपण देखिल ज्याप्रमाणे अतिरेक्यांना जात-धर्म नाही त्याप्रमाणे आपली सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रत्येकाने आपल्या पासून सुरुवात करावी. आपल्या घरापासून, आपल्या

परिसरापासून, आपण स्वतः जागरुत राहिलो आणि नागरिकांना जागरुत केले आणि प्रशासनामार्फत याबाबत कडक अंमलबजावणी झाली तर भविष्यात अशा घटनांना चाप बसू शकतो आणि वेळीच त्या रोखल्या जाऊ शकतील. महापौर महोदय, त्यासाठी आपली पोलिस यंत्रणा सक्षम आहे. परंतू पोलिस देखिल माणूस आहे. ज्यावेळी त्यांना तपासाच्या गोष्टी सूचित केल्या जातील किंवा एखादी दुर्घटना घडणार आहे त्याची पुसटशी कल्पना किंवा संशय स्थानिक नागरिकांना आला आणि त्याची कल्पना दिली गेली तरच असे प्रकार रोखले जातील. परंतू सुरक्षा व्यवस्थेच्या नावाने आपणही भरपूर चुका करत आहोत. हया इमारतीमध्ये हा देखिल महत्वाचा विषय आहे. महापौर महोदय, शाळांमधील सुरक्षा व्यवस्थेच्याबाबत आताच सन्मा.सदस्या बोलल्या ती सत्य घटना आहे. ज्या पध्दतीने कामकाज चालले आहे ते चुकीचे चाललेले आहे. सुरक्षा व्यवस्थेबाबत कटाक्षाने कडक भुमिका ठेवावी. नुसतेच सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लावलेत आणि ते स्वयंचलीत गेट लावलेत. ज्यातून आपल्याला समजते कोणी धातु सदृश वस्तू आत नेतोय की नाही. पण इतर सुध्दा मार्ग आहेत त्याबाबत काय? त्याबाबत कर्मचा-यांकडून कुठलीही व्यवस्था तपासली जात नाही. उदया जर तसा प्रकार घडू नये पण घडला तर किंवा तशी काही तयारी झाली. आपल्या या महापालिका मुख्यालय इमारतीमध्ये आपण मॉपड्रिल घेतली. पण त्य मॉपड्रीलच्या अनुषंगाने आपण पुढील कार्यवाही केली का? महापौर महोदय, आपण मा.आयुक्तांना तसे आदेश दयावेत की, या सदनाची जशी आपण सुशोभितता राखता ती किती कमकुवत आहे यापूर्वी दोन वेळा आपल्याला अनुभव आलेला आहे. त्याबद्दल देखिल आपण लक्ष दयावे. आम्ही चुका दाखवतोय म्हणजे आम्ही तुमच्या विरोधात नाही. परंतू चुका हया सुधारल्या पाहिजेत. पण दुर्घटना टाळण्यासाठी डोळे उघडे ठेवा. आज त्यांची वेळ आहे उदया आपली असेल. जी घटना घडली ती अत्यंत लाजीरवाणी, अत्यंत खालच्या दर्जाची, त्याबाबत बोलणे म्हणजे त्या शब्दांचा अपमान असेल. अशी माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. आणि ज्याना हृदयच नाही त्या दगडांबद्दल निषेध करुन काही उपयोग सुध्दा नाही. त्यांना त्यांच्या पध्दतीनेच उत्तर दिले गेले पाहिजें. परंतू जी दुःखद घटना घडली आहे तिचा निषेध जरी ते आपल्या देशाचे विरोधक असतील परंतू त्या माय-भगिनी ज्यांची मुलं गेली आहेत त्यांच्या परिवारात अख्खा भारत देश, अख्खे जग सामिल झालेले आहे. जसे आपल्यामध्ये पाकिस्तान सोडून सगळे जण सामिल झाले आहेत. पण आज पाकिस्तानला कळेल आपण चुकीचे वागतोय. त्यांच्याकडेही सुरुवात झाली आहे जे पेरले आहे. घडलेल्या त्या दुःखद घटनेचा मी या ठिकाणी निषेध करतो आणि त्या लहान मुलांच्या मृत्यास चिरशांती लाभो आणि जे नागरिक गेलेले त्यांना देखिल चिरशांती लाभो. आणि त्यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर देवो. एवढे बोलून मी माझ्यावतीने माझ्या परिवाराच्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अपर्ण करतो. धन्यवाद..

**श्री. विक्रांत चव्हाण :-**

मा.महापौर महोदय, मा.आयुक्त आणि मा.सभागृह. पाकिस्तानमधील पेशावर या शहरामध्ये दिनांक १६ डिसेंबर रोजी जी घटना घडली त्या घटनेबाबत दुःख व्यक्त करण्याकरीता, घटनेचा निषेध व्यक्त करण्याकरीता या सभागृहातील सन्मा.सदस्य, श्री. रामभाऊ तायडे, श्री. संभाजी पंडीत, श्री. संजय भोईर आणि श्री. मनेज शिंदे यांनी जी सभा तहकूबी मांडली आहे आणि तिला सर्वपक्षिय सदस्यांनी जे मनोगत मांडले त्याचे मी या ठिकाणी स्वागत करतो. महापौर महोदय, या विषयावर फार बोलण्यासारखे नाही. विश्लेषण करण्यासारखी बाब नाही. हया सभा तहकूबीच्या विषयावर मी एवढेच सांगेन की, हा काही उत्कंठावर्धक विषय नाही. मनाला दुःख देणारा विषय आहे. मी एवढेच सांगेन की, मानव धर्म किंवा मानव जीवन हे आयुष्यात सर्वांना एकदाच मिळते आणि मृत्यू हा अटळ असतो. परंतू मृत्यू केंव्हा येणे आणि कशाप्रकारे येणं याला एक धर्म आहे आणि ही जी घटना घडली आहे, आपण एककडे म्हणतो लहानपण देगा देवा. आणि असे असताना लहानपणीच अशाप्रकारे जीव हिरावून नेणं मग ती मुलं कोणाची ही असो. तुमची असो, आमची असो मुलं ही मुल असतात. मला ही लहान मुलगी आहे. बिछान्यावर जागा पुरत नाही, मुलगी लोळते म्हणून मी खाली झोपतो आई आणि लेक वर झोपते. परंतू झोपडयाच्या आधी मी तिन्ही बाजूने उश्या लावतो आणि जरा जरी हालचाल झाली तरी माझी झोप उडते की, लेक पडली नाही ना. माझी मुलगी आठ महिन्यांची होती आणि एक दिवशी ती अचानक माझ्या अंगावर पडली. एवढ्याशा घटनेने आपला जीव कासाविस होतो. लहान मुलांना मरण येणे. त्या दिवशी अक्षरः जीव हळहळला, माझी

महापौर

पत्नी त्या दिवशी जेवली सुध्दा नाही. मुलं कोणाचीही असोत त्या मातेवर काय वेळ आली असेल हे सर्व माता आणि पिताच जाणवू शकतात. माझी आई आजही रात्री अकरा-बारा वाजता माझ्या मिसेसला फोन करते हा घरी आला का? माझे वडील फोन करतात काय बाबा घरी गेलास का? अशाप्रकारच्या भावना असतात शेवटी मुल हे मुल असतं. त्यामुळे मी सर्व सन्मा.सदस्यांना सांगेन की, काही सदस्यांना हे ही सांगेन की, शेवटी मानवधर्म हा मानवधर्म आहे. हिंसा ही हिंसा आहे. जसा हिंसेला रंग नसतो किंवा हिंसात्मक कार्य करणा-यांना रंग नसतो. विघातक गोष्टी करणा-यांना रंग नसतो. त्याच मानवतेना जात-धर्म नसते. मानव हा मानव असतो आणि कुठल्याही मानवावर किंवा दुश्मनावर देखिल अशी वेळ येऊ नये. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक थोर पुरुषांचा वारसा लाभलेला आपला देश आहे. बाळासाहेबांचा वारसा लाभलेला आपला देश आहे. बाळासाहेबांनी प्रसंगी, छत्रपतींनी प्रसंगी अशी भुमिका घेतलेली होती. महात्मा गांधी तर हिंसेच्या विरोधातच होते. ते जीव सोडताना सुध्दा हे राम म्हणाले. परंतू छत्रपती आणि बाळासाहेबांसारखी माणसं सुध्दा या ठिकाणी होती की, ज्यांनी वेळ आल्यावर तलवारी उपसल्या होत्या. म्हणजे त्या त्या वेळी जी भुमिका उचलावी लागली. अमरनाथ यात्रेमध्ये आपल्या यात्रेकरुना त्रास झाला त्यावेळेस बाळासाहेबांनी सांगितले की, जर अशाप्रकारे तुम्ही त्रास देत असाल तर हज यात्रेकरुंना आम्ही जाऊ देणार नाही. ज्यावेळेस सिमेवर प्रश्न उद्‌भवला त्यावेळी बाळासाहेबांनी पाकिस्तान येथे खेळाडू खेळू नये म्हणून वानखेडेचे खेळपट्टी उधळून लावली. मात्र ज्यावेळेस मियाजाद या ठिकाणी आले त्यावेळी त्यांनी मातोश्रीवर बाळासाहेबांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. बाळासाहेबांनी त्यांचे उघड मनाने स्वागत केले. छत्रपतींनी अफजलखानचे सुध्दा उघड मनाने स्वागत केले. त्यामुळे मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, कुठल्याही मृत्यू वरती किंवा कुठल्याही दोन देशाच्याबाबतीत आपण अशाप्रकारे राजकारण करु नये. मुलं ही मुलं आहेत आणि त्यातल्या त्यात लहान मुलं आहेत. त्यांनी आपल्या २६/११ च्या घटनेचा निषेध का केला नाही? आपला भारत देश आहे, आपल्या देशाला एक परंपरा आहे. आपल्या भारत देशामध्ये सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र राहतात. आजही एकामेकाच्या घरी खातात, वेळ पडली तर एकामेकाला आपण रक्त सुध्दा देतो. त्यावेळेस आपण जात-धर्म बघत नाही. या ठिकाणी आपण प्रत्येक जाती-धर्माच्या प्रार्थना स्थळी जातो. कुराण असो, भगवत् गीता असो, बायबल असो आपण हे मानतो. मी ही अजमेरला जातो. बाळासाहेबही आजमेरला जाऊन आलेत. त्यामुळे अशाप्रकारच्या भावना बाजूला ठेवून आपण आपलं हया घटनेबाबतीत दु:ख व्यक्त केले पाहीजे, तशाप्रकारे आपल्या भावना व्यक्त केल्या पाहिजेत. आपल्या सभागृहाच्या भावना देशापर्यंत पोहचतील की नाही ते मला माहिती नाही. परंतू आपण जर सभा तहकूब केली तर ठाणेकरांपर्यंत आपल्या भावना नक्की पोहचतील. अशी तहकूबी मांडताना मी एवढेच सांगेन की, ज्याप्रकारे सन्मा.सदस्या नम्रता ताई किंवा घाडीगांवकर, नजीब मुल्ला, संजय वाघुले यांनी शाळेच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत जी सुचना केली आहे. मला वाटते सी.सी. टी.व्ही. लावून काही होणार नाही. सी.सी. टी.व्ही. लावल्याने कोण आला कोण गेला एवढेच कळेल. परंतू हया घटनेमधून आपण धडा घेतला पाहिजे की, संपूर्ण देश असुरक्षित आहे, देशामध्ये अशाप्रकारे अतिरेकी घुसलले आहेत, घुसत असतात. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, या ठाणे महापालिके पुरत्या काही गोष्टी आपल्या हातात आहेत. ठाणे महापालिकेच्या जेवढया शाळा आहेत तिथे कशाप्रकारे सुरक्षा व्यवस्था कडक केली जाईल. त्या अनोळखी इसमांना शाळेच्या आत प्रवेश कशाप्रकारे नाकारता येईल त्यासाठी कशाप्रकारचे गेट असावेत, कशाप्रकारे सुरक्षा व्यवस्था टाईट असावी, चारी बाजूच्या भिंती उंच असाव्यात. शाळेत मुलांबरोबर त्यांचे शिक्षक असतात इतर कर्मचारी वर्ग असतो. आणि हया सर्वांचे पालक किंवा नातेवाईक जे बाहेर असतात त्यांचे जीव टांगणीला असतात. माझी मिसेस मला जेवायला वाढत होते तेवढयात फोन आता ती मला म्हणली थांब आपली लेक शाळेत गेली आहे हा फोन मला घेतला पाहिजे अशी परिस्थिती या जगामध्ये आहे. मुलांच्याबाबतीत असुरक्षितता आहे. त्यामुळे अशा सभा तहकूबीचे तसेच सूचनांचे मी या ठिकाणी स्वागत करतो आणि या सभागृहाला नव्हे तर सभागृहाच्या वतीने महापौरांना, मा.आयुक्तांना विनंती करतो की, ही सभा मानवतेच्या दृष्टीकोनातून त्या लहान मुलांना श्रध्दांजली वाहण्याकरीता संपूर्ण दिवस तहकूब करावी. माझ्या कुटूंबियांतर्फे, माझ्या प्रभागातर्फे, माझ्या पक्षातर्फे आणि संपूर्ण देशातर्फे मी त्यांना श्रध्दांजली अपर्ण करतो. धन्यवाद.

महापौर

**श्री. संतोष वडवले :-**

मा. महापौर महोदय, दिनांक १६ डिसेंबर २०१४ रोजी पाकिस्तान येथील पेशावर शहरातील सैनिकी शाळेमध्ये अतिरेक्यांनी निघृण हत्या केली आणि त्यामध्ये जवळपास १४५ लहान लेकरांना त्यांनी मारले आहे. दहशतवादयांनी त्यांची अतिशय क्रुरपणे हत्या केली. हया हल्यामुळे संपूर्ण हिंदुस्थान हळहळला. टि.व्ही.वर सर्वांनी तो प्रसंग पाहिला. आपला देश पूर्णपणे हिंसेच्या विरोधात आहे. आपण नेहमीच हिंसेच्या विरोधात उभे राहिलो आहोत. मघाशी आपल्या मुंब्राच्या महिला सदस्यांनी सांगितले की, याआधी माती आमची होती हत्यारं तुमची होती. आता मातीही तुमची आणि हत्यारंही तुमचीच खरोखर ही वस्तुस्थिती आहे. यापूर्वी आपल्यावर अशा वेळा येऊन गेलेल्या आहेत. आज त्यांच्यावर वेळ आली आहे. असे बरेचसे प्रसंग आपण रेटून नेलेले आहेत. परंतू अशाप्रकारचे हल्ले कुठल्याही देशामध्ये होऊ नयेत अशी हिंदुस्थानातील प्रत्येक नागरिकाची भावना असते. अशाप्रकारचा हल्ला मानवतेला काळिमा फासणारी घटना आहे. अशाप्रकारच्या घटना कुठल्याच देशामध्ये जगभरामध्ये होऊ नयेत अशी प्रत्येकाची भावना आहे. हया हल्ल्यामध्ये जे निष्पाप बालक गेलेले आहेत. त्यांना आमची भावपूर्ण श्रध्दांजली.

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा. महापौर महोदय, आज सभागृहामध्ये लोकशाही आघाडीचे नेते श्री. संजय भोईर आणि या सभागृहातील जेष्ठ सदस्य श्री. मनोज शिंदे, श्री. रामभाऊ तायडे, श्री. संभाजी पंडीत यांनी या सभागृहामध्ये यांनी बालकांच्या निघृण हत्येच्या संदर्भात सभा तहकूबी मांडली आणि त्याच्यानंतर या सभागृहामध्ये ब-याच अंशी सदस्यांनी चर्चा केली आहे. वास्तविक पाहता अशा प्रवृत्तींना जात-पात-धर्म, देश नसतो. ही एक प्रवृत्ती असते. या ठिकाणी निवेदन करत असताना या सभागृहातील भगिनींनी एक माता म्हणून निवेदन केले. आणि ते निवेदन होत असताना निश्चितप्रकारे या सभागृहामधील सर्व सदस्यांचे हृदय हेलावून गेल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. परिस्थितीच तशी आहे कारण आपला मुलगा शाळेत जातो आणि शाळेतून परत येतो की नाही अशाप्रकारची ज्यावेळी चिंता निर्माण होते. त्यावेळी एक वेगळयाप्रकारचे चित्र हया सभागृहामध्ये आपल्याला बघायला मिळाले. महापौर महोदय, मी आपणांस विनंती करेन की, झालेली घटना ही अतिशय दु:खदायक क्लेशदायक आहे आणि हया घटनेचा निषेध देशाचे सर्वोच्च सभागृह संसद यांनी सुध्दा केलेला आहे. याच्या पुढे जाऊन जगातील सर्व मान्यवरांनी या घटनेचा निषेध केलेला आहे. अशप्रकारची घटना होऊ नये अशाप्रकारचे मत सर्वांनीच या ठिकाणी नोंद केले आहे. महापौर महोदय, आमच्या चारही सदस्यांनी या ठिकाणी मांडलेली तहकूबी या सभागृहामध्ये चर्चेला आल्यानंतर मी निश्चितप्रकारे आपल्याला विनंती करेन की, सदरची सभा ही लहान बालकांच्या विदयार्थ्यांचा विषय असल्याने ही संपूर्ण सभा तहकूब करावी. आणि त्याच बरोबर आपल्या महिला सदस्यांनी या ठिकाणी केलेल्या सूचनेप्रमाणे आपल्या महापालिकेच्या ज्या शाळा आहेत कारण अशाप्रकारची एक प्रवृत्ती असते ती अमुकच ठिकाणी अशाप्रकारचे कृत्य करेल असे नसते. त्यामुळे अशाप्रकारची कृत्य कुठेही घडू शकतात. म्हणून महापालिका हद्दीमध्ये असलेल्या सर्व शाळांना संरक्षक भिंत आहे का? त्यामध्ये सुरक्षारक्षक आहेत का हे सुध्दा हया माध्यमातून पहावे अशाप्रकारची मी विनंती करतो आणि आजची ही सभा पूर्ण वेळासाठी तहकूब करावी. त्या बालकांना मी माझ्यावतीने मझ्या कुटूंबाच्यावतीने, लोकशाही आघाडीच्या वतीने, सभागृहाच्या वतीने, राज्याच्यावतीने आणि देशाच्यावतीने आदरांजली वाहतो. धन्यवाद.

**मा.सभागृह नेते :-**

मा.महापौर महोदय, आज महासभा सुरु झाल्यानंतर नुकतेच पाकिस्तानामध्ये झालेल्या लहान मुलांच्या हत्याकांडा संदर्भात सभा तहकूबी मांडणारे सन्मा.सदस्य श्री. रामभाऊ तायडे आणि श्री. संभाजी पंडीत, सन्मा.सदस्य श्री. संजय भोईर आणि त्यांना अनुमोदन देणारे श्री. मनोज शिंदे त्याचबरोबर सभागृहातील अनेक सदस्यांनी त्या लहान बालकांना आदरांजली वाहलेली आहे आणि त्यांना आपआपल्या मतानुसार, आप-आपल्या विचारानुसार श्रध्दांजली अपर्ण केलेली आहे. त्याचबरोबर काही सदस्यांनी ही अशी हत्याकांड होऊ नयेत म्हणून काय जबाबदारी घ्यायला पाहिजे, काय करायला पाहिजे अशाप्रकारची मत सुध्दा मांडलेली आहेत. ही चर्चा सुरु असताना, आपल्या देशातील आपल्या राज्यातील आणि पर्यायाने आपल्या शहरातील शाळकरी मुलांचे सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेण्याच्या दृष्टीने सुध्दा काही सदस्यांनी

सूचना मांडलेल्या आहेत. आपले कर्तव्य आहे की, हया देशात दहशतवादी कृत्य करणा-या एका देशाच्या दहशतवादी कारवायांमुळे कुठेतरी शांतता बिघडणार आहे आणि त्याकरीता काळजी घेणे हे फार महत्वाचे आहे आणि त्या दृष्टीने आपण आपल्या शाळेतील मुलांची काळजी घेण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली पाहिजेत. त्याचबरोबर काही सदस्यांनी या ठिकाणी पाकिस्तानात जे कृत्य घडल त्या संदर्भात सुध्दा या देशाने काय काळजी घ्यायला पाहिजे यासंदर्भात सुध्दा विचार मांडलेले आहेत. आम्ही अनेक प्रतिक्रिया दुरचित्रवाणीवर ऐकल्या पाकिस्तानमधील काही लाकांच्या दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या नेत्यांच्या की, आम्हाला भारताची श्रध्दांजली नको. आम्हाला श्रध्दांजलीची गरज नाही. अशाप्रकारची मतं सुध्दा त्या पाकिस्तानामधील काही नागरिकांची मत आपण पाहत आहोत. मा.महापौर महोदय, अशी मतं पात असताना, मिनाक्षी शिंदे मॅडमसारख्या एका नगरसेविकेने जर आपले मत व्यक्त केले तर काय चुकीचे ठरतं ? मुलांबद्दल सहानुभूती आहेच. जे घडलेले आहे ते चुकीचे आहे असे मत त्यांनी मांडलेले आहे. परंतू जी लोक अशाप्रकारे देश विघातक कार्य करत आहेत आणि तरी सुध्दा भारतावर ठपका ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. तेंव्हा एका स्वाभिमानी भारतीयाला, स्वाभिमानी हिंदुस्थानी नागरिकाच्या मनात अशाप्रकारच मत येतं आणि म्हणून त्यांच्याकडून तशाप्रकारे मत व्यक्त झालेले आहे. महापौर महोदय, अनेक सदस्यांनी या ठिकाणी आप-आपली मतं व्यक्त केली. माझे म्हणणे आहे की, जरी त्यांना आपली श्रध्दांजली नको असेल तरी सुध्दा आम्ही या भारताचे नागरिक आहोत, आम्ही हिंदुस्थानाचे नागरिक आहोत, आम्ही हिंदुस्थानी आहोत हे मनात ठेवून आपण जो काही ठराव करणार आहोत त्या ठरावाची प्रत पाकिस्तान देशाला सुध्दा पाठवावी अशप्रकारची मागणी मी या ठिकाणी करतोय आणि त्या सर्व मुलांना आमच्या ठाणे महानगरपालिकेची सर्व पक्षिय नगरसेवकांतर्फे आणि नागरिकांतर्फे श्रध्दांजली वाहून ही सभा पूर्ण वेळ तहकूब करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**मा. महापौर सो. :-**

सन्मा.सदस्य, श्री. रामभाऊ तायडे, श्री. संभाजी पंडीत, श्री. संजय भोईर आणि सन्मा.मनोज शिंदे यांनी पाकिस्तानमध्ये पेशावर या शहरातील सैनिक शाळेमध्ये जी अमानुष घटना घडली त्या संदर्भात सभा तहकूबी मांडली. या घटने संदर्भात प्रत्येकांनी आप-आपल्या मताप्रमाणे आपले विचार व्यक्त केले. ज्या ठिकाणी हा प्रकार घडला त्या शाळेतील मुलांच्या डोळयात आणि डोक्यात गोळया घातल्या असा अमानुष घटनेबाबत निषेध व्यक्त करत असताना, आपल्या देशात किंवा आपल्या शहरात अशाप्रकारची घटना घडू नये आणि त्यासाठी सावधगिरी बाळगळयासाठी केलेल्या सुचनांचा प्रशासनाने विचार करावा आणि माणुसकीला कालिमा फासणारी ही जी घटना घडली आहे त्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी सभागृहाचा सेन्स लक्षात घेता, सदरची सभा ही पूर्ण वेळ तहकूब करण्यात येत आहे. परंतू त्यापूर्वी आपण सर्वांनी उभे राहून दोन मिनिटं श्रध्दांजली अपर्ण करु या.

**(तद्‌नंतर श्रध्दांजली अपर्ण करुन मा.महापौर महोदय, सायंकाळी ०४.३५ वाजता सभा तहकूब करतात.)**

## दुखवटा ठराव

### ठाणे महानगपालिका ठराव क्रमांक ७८८/२ दिनांक १९/१२/२०१४

**ठ रा व :-**

आपल्या राष्ट्राच्या शेजारी असलेल्या पाकिस्तानामधील पेशावर येथे तहेरिके तालिबान या अतिरेकी संघटनेच्या सैतानांनी मंगळवारी निरपराध बालकांचे निघृण हत्याकांड केले. सदर बालके उपरोक्त ठिकाणी सैनिकी शाळेमध्ये शिक्षण घेत होते. शिक्षणासारख्या पवित्र व शांत ठिकाणी निरगस अशा या बालकांची हत्या करुन रक्तपात घडवला या हल्ल्यात शाळेतील १३२ विद्यार्थी, ९ कर्मचारी असे एकूण १४१ जण ठार व २४५ जण जखमी झाले. माणुसकीला काळिमा फासणा-या या अमानुष हल्ल्याचा जगभरातील नेत्यांनी धिक्कार केला आहे व ते योग्यच आहे. अशा या कठिण प्रसंगी जगातील प्रत्येक शांतताप्रिय व्यक्ती, संस्था व देशांनी या संपूर्णपणे निंदनीय घटनेचा निषेध करुन अतिरेकी संघटनांच्या विरुध्द एकी दर्शविणे गरजेचे आहे.

अशा या अमानुष व निघृण हत्येचा ही सर्वसाधारण सभा निषेध करीत असून या हल्ल्यात मृत पावलेल्या बालकांना श्रध्दांजली वाहून तसेच जखमी झालेल्या व सर्व संबंधितांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सर्वसाधारण सभा सहभागी होत आहे.

सुचक :-श्री. नरेश म्हस्के

अनुमोदक :- श्री. हणमंत जगदाळे

सही/-
(श्री. संजय भाऊराव मोरे )
महापौर,
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**(तद्नंतर श्रध्दांजली अपर्ण करुन मा.महापौर महोदय, सायंकाळी ०४.३५ वाजता सभा तहकूब करतात.)**

**(मनिष जोशी)**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकूब केल्याची वेळ :- सायं. ४.३५ वा.**
**सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक :- १९/१२/२०१४**

**सही/-**
**(श्री.संजय भाऊराव मोरे )**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

दि.१३-४-१५ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.